। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २०९ वा । शुक्रवार दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाचा निर्णय

### अधिकारी-कर्मचाऱ्यांना मिळणार कायमस्वरूपी मोबाईल नंबर

धाराशिव, (जिमाका)- जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाने सोयीसाठी एक महत्वाचा आणि दूरदर्शी निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांना अधिकाऱ्यांशी संपर्क साधताना येणाऱ्या अडचणींचा विचार करून,आता राज्यभरातील सर्व कृषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी मोबाईल नंबर उपलब्ध करून दिले जाणार आहेत.या निर्णयानुसार,संबंधित अधिकारी बदलीवर गेल्यानंतर तोच मोबाईल नंबर थेट नवीन अधिकारी - कर्मचाऱ्यांकडे हस्तांतरित केला जाईल.त्यामुळे शेतकऱ्यांना सतत एकच क्रमांक वापरून आवश्यक माहिती मिळविणे,तक्रारी नोंदविणे तसेच विविध योजनांबाबत मार्गदर्शन घेणे अधिक सुलभ होणार आहे.

हा निर्णय जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय,तालुका कृषी अधिकारी कार्यालय,मंडळ कृषी अधिकारी कार्यालय तसेच मंडळ सहाय्यक कृषी अधिकारी या सर्व स्तरांवर लागू होणार आहे.यापूर्वी अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या बदलीनंतर मोबाईल नंबर बदलल्याने शेतकऱ्यांना तात्काळ संपर्क साधण्यात अडचणी येत होत्या. त्या पार्श्वभूमीवर ही सुविधा सुरू करण्यात आली आहे.

राज्यभर एकसमान प्लॅन लागू करण्यात आला असून,तो थेट कृषी विभागामार्फत नियंत्रित केला जाणार आहे.कायमस्वरूपी नंबरसाठी जिओ कंपनीचे पोस्टपेड सिम कार्ड देण्यात येणार आहे.या संदर्भातील शासन निर्णयही आता जाहीर करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे,हा मोबाईल नंबर फक्त शासकीय कामकाजासाठीच वापरता येणार असून,गुगल पे,फोन पे,बँकिंग व्यवहार किंवा कोणत्याही वैयक्तिक कामासाठी या सिमचा वापर करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांपर्यंत तात्काळ माहिती पोहोचवणे,सेवा पुरवणे आणि तक्रार निवारण प्रणाली अधिक प्रभावी बनवणे या उद्देशाने हा निर्णय महत्त्वपूर्ण आणि उपयुक्त ठरणार असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

## क्राईम न्युज

### गुंगीकारक गांजा चिलीम मध्ये भरुन सेवन करणाऱ्यावर गुन्हा दाखल

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत प्रवेश रा. लखनीपुर ता. जि. बलरामपुर राज्य उ. प्रदेश ह.मु. डिग्गी ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.२९.०५.२०२५ रोजी १८.३० वा. सु. एकोंडी जाणारे रोडलगत चिंचोळे यांचे शेतामध्ये उमरगा येथे गुंगीकारक गांजा पदार्थ चिलीम मध्ये भरुन सेवन/ओढत असताना उमरगा पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तींविरुध्द एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ कलम २७ अन्वये उमरगा पो.ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे.

### आठवडी बाजारातून मोबाईलची चोरी

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अमोल सुब्राव लोखंडे, वय ३२ वर्षे, रा.दत्ता नगर ढोकी ता. जि. धाराशिव यांचा दि.२८.१०.२०२५ रोजी सायंकाळी आठवडी बाजार अंबाबाई मंदीराचे पाठीमागे ढोकी येथे अमोल लोखंडे यांचे पॅन्टचे खिशातील अंदाजे २२,००० किंमतीचा व्हिवो कंपनीचा मोबाईल फोन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अमोल लोखंडे यांनी दि.२९.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मोटारसायकल व मोबाईलची चोरी

वाशी (प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी चिमाजी दगडु कुह्राडे, वय ५५ वर्षे, रा. बेळगाव ता. आंबड जि. जालना यांची होंन्डा युनिकॉर्न मोटरसायकल व मोबाईल फोन असा एकुण ५०,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने दि.१०.१०.२०२५ रोजी ०३.०० वा. सु. वाशी येथील उमग हॉटेल जवळुन चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-चिमाजी कुह्राडे यांनी दि.२९.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या. सं. कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### सोन्या-चांदीच्या दागिण्याची चोरी

तामलवाडी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गतफिर्यादी प्रविण कुंडलिक साळवे, वय ३२ वर्षे, रा. मसला खु. ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे भाउ नामे प्रदिप कुंडलिक साळवे यांचे राहते घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.२६.१०.२५ रोजी तोडून आत प्रवेश करुन कपाटामध्ये ठेवलेले २४ सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने, असा एकुण १,३७,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-प्रविण साळवे यांनी दि.२७.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाडी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(४), ३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## महाडीबीटी शिष्यवृत्ती अर्ज नोंदणी कमी : विद्यार्थ्यांनी तात्काळ अर्ज भरावेत समाज कल्याण विभागाचे आवाहन

धाराशिव (जिमाका)- सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत देण्यात येणाऱ्या भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता अशा विविध योजनांसाठी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील अर्ज भरण्याची प्रक्रिया http://mahadbtmahit.gov.in या संकेतस्थळावर १ जुलै २०२५ पासून सुरू करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने महाडीबीटी प्रणालीवरील डॅशबोर्डचे अवलोकन केले असता,सन २०२५-२६ साठी अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज नोंदणीचे प्रमाण कमी असल्याचे आढळून आले आहे.

त्यामुळे ज्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अद्याप शिष्यवृत्ती अर्ज भरलेले नाहीत,त्यांना महाविद्यालय स्तरावरून तात्काळ सूचित करण्यात यावे,असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जांची शासन निर्णयातील निकषांनुसार परिपूर्ण छाननी करून, पात्र अर्ज तात्काळ समाज कल्याण कार्यालयाकडे अग्रेषित करावेत, असेही आवाहन करण्यात आले आहे.

महाविद्यालयातील प्रवेशित एकही पात्र मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही,याची विशेष दक्षता घ्यावी,असे सांगून श्री.सचिन कवले,सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,धाराशिव यांनी विद्यार्थ्यांना त्वरित अर्ज भरण्याचे आवाहन केले आहे.

## शिष्यवृत्ती अर्ज तत्काळ सादर करा: प्रलंबित अर्जांची जबाबदारी महाविद्यालय प्राचार्यांची : इतर मागास बहुजन कल्याण विभागाचा इशारा

धाराशिव,दि.३० ऑक्टोबर (जिमाका) इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत VJNT, OBC आणि SBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या भारत सरकार शिष्यवृत्ती,शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती,राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता या योजनांसाठी सन २०२४-२५ शैक्षणिक वर्षातील अर्ज तात्काळ भरून, http://mahadbtmahit.gov.in या संकेतस्थळावरून ३० ऑक्टोबर २०२५ पर्यंत सादर करावेत,असे आवाहन करण्यात आले आहे.

सन २०२४-२५ साठी बहुतांश विद्यार्थ्यांनी अर्ज भरलेले असले तरी,हे अर्ज महाविद्यालयस्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे.अनेक महाविद्यालय प्राचार्यांनी अद्याप अर्जांची पडताळणी करून ते सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयाकडे सादर केलेले नाहीत.

त्यामुळे जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयाच्या लॉगिनवरील प्रलंबित व्हिजिन OBC आणि SBC प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज तात्काळ मंजुरीसाठी सादर करावेत,असे निर्देश देण्यात आले आहेत.अर्ज सादर करताना शाळा सोडल्याचा दाखला (T.C.) आणि गुणपत्रक हे मुळ प्रतीत (Original) असणे बंधनकारक आहे.तसेच त्रुटी असलेल्या अर्जांची त्रुटीपुर्तता करूनच ते मंजुरीसाठी पाठवावेत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

महाविद्यालयाच्या लॉगिनवर एकही अर्ज प्रलंबित राहणार नाही,याची विशेष दक्षता घ्यावी,असे आदेश देण्यात आले आहेत.तसेच,ज्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अद्याप शिष्यवृत्ती अर्ज भरलेले नाहीत,त्यांना अर्ज भरण्यासाठी तातडीने सूचित करण्यात यावे,असेही आवाहन करण्यात आले आहे.

सद्यस्थितीत जिल्ह्यात महाविद्यालय स्तरावर आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये २३२ अर्ज,सन २०२४-२५ मध्ये ६५१ अर्ज,आणि २०२५-२६ मध्ये १७०० अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून आले आहे.याशिवाय,सन २०२३-२४ मधील ८३० व २०२४-२५ मधील १८२९ असे एकूण २६५९ अर्ज २पव खर्पीरश्रश्राशपीं साठी प्रलंबित असल्याचेही नोंदले गेले आहे. त्यामुळे सर्व प्रलंबित अर्ज ३१ ऑक्टोबर २०२५ अखेर निकाली काढणे आवश्यक असल्याचे निर्देश देण्यात आले आहेत.१ नोव्हेंबर २०२५ नंतर सन २०२३-२४ आणि २०२४-२५ आर्थिक वर्षांचे अर्ज या कार्यालयाकडून मंजूर केले जाणार नाहीत,असेही स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

शिष्यवृत्तीकरिता महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी करूनही विद्यार्थी लाभापासून वंचित राहिल्यास,त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालय प्राचार्यांची राहील,असे श्री.अमोल ताकभाते,सहाय्यक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण,धाराशिव यांनी कळविले आहे.

## जगन्नाथ गोशाळेचा गोमाता पुजन अनोखा उपक्रम



मुरूम (सुधीर पंचगल्ले)- मुरूम येथे श्री जगन्नाथ गोशाळेत उमरगा तालुक्यातील मौजे औराद येथील श्री.यादव विश्वंभर सूर्यवंशी यांनी आपली देशी गोवंश गोमाता श्री जगन्नाथ गोशाळेला देणगी म्हणून आणून दिली,या गोमातेचे मुरूम येथे आगमन होताच हलगी या गजरात श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक ते श्री जगन्नाथ गोशाळा पर्यंत ढोल ,हलगी च्या गजरात या गोमातेचे संपूर्ण मुरूम मधून मिरवणूक काढत गोमातेचे स्वागत,पूजन व औक्षण करण्यात आले सर्वप्रथम श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रोटरी क्लब मुरूम च्यावतीने गोमातेचे पूजन करण्यात आले,यावेळी रोटरीचे अध्यक्ष अप्पासाहेब सूर्यवंशी,मल्लिनाथ बडोले,डॉ नितीन डागा,डॉ. सुधीर पंचगल्ले,सुनील राठोड,संतोष कांबळे,वाकडे सर,कल्लाप्पा पाटील,भूषण पाताळे,आदी उपस्थितीत होते,तसेच यावेळी श्री जगन्नाथ गोशाळाला गोमाता देणगी म्हणून देणारे श्री यादव विश्वंभर सूर्यवंशी यांचेही स्वागत करण्यात आले,लुटे किराणा येथे गोमाता चे आगमन होताच लुटे किराणा च्यावतीने गोमातेचे पूजन करण्यात आले,महात्मा बसवेश्वर चौक येथे अंबर हार्डवेअरच्या वतीने मंथन अंबर यांनी गोमातेचे पूजन केले तसेच सिद्धाप्पा मठ येते साई किरण,मेडिकल व मुदकन्ना परिवाराच्या वतीने गोमातेचे पूजन औक्षण करण्यात आले.शेवटी श्री जगन्नाथ गोशाळा येथे सौ क्रांती सूर्यवंशी यांच्या हस्ते गोमातेचे पूजन करण्यात आले या वेळी श्री जगन्नाथ गोशाळा चे निर्मलकुमार लिमये, सूरज राजपूत ,रौनक शर्मा, प्रकाश सूर्यवंशी हजर होते.

## अवैध गुटखा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- लोहारा पोलीस ठाणे अंतर्गत योगेश रा. हिप्परगा रवा ता. लोहारा जि. धाराशिव यांनी दि.२६.१०.२०२५ रोजी १५.०० वा. सु.आपल्या पंक्चर चे दुकान हिप्परगा रवा येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ केसरयुक्त विमल पान मसाला ४५ पुडे,तंमाबुख चे ४५ पुडे, एकुण १३,५०० किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगुन विक्री करत असताना लोहारा पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम- १२३,२२३, २७४, २७५ सह अन्न सुरक्षा मानके कायदा कलम ५९ अन्वये लोहारा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

तसेच उमरगा पोलीस ठाणे अंतर्गत साजीद वय २२ वर्षे, रा. तुरोरी ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.२९.१०.२०२५ रोजी किराणा दुकानात तुरोरी येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला गुटखा व तत्सव पदार्थ प्रतिबंधीत गुटखा तंबाखु जन्य तत्सम पदार्थ विमल पान मसाला, व्ही १ तंबाखु डायरेक्टर पान मसाला, शॉ ९९९ असे एकुण २,०५९ किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगुन विक्री करत असताना उमरगा पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द भा.न्या.सं. कलम- १२३, २२३, २७४, २७५ सह अन्न सुरक्षा मानके कायदा कलम ५९ अन्वये लोहारा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## सोयाबीन २२ पोते, उडीद २२ पोते, काबुली चना २ पोते, मुग २ पोते अशी अज्ञाताने केली चोरी

नळदुर्ग (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-बळीराम नागनाथ बिराजदार, वय ६० वर्षे, रा. आई लक्ष्मी फार्मस प्रोड्युसर कंपनी लि. दिंडेगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव यांचे दिंडेगाव शिवारातील शेतातील गोडवुनचे शटरचा पत्रा अज्ञात व्यक्तीने दि.२४.१०.२०२५ रोजी १८.०० वा. सु.ते दि.२५.१०.२०२५ रोजी १०.०० वा. सु. उचकटुन आत प्रवेश करुन सोयाबीन २२ पोते, उडीद २२ पोते, काबुली चना २ पोते, मुग २ पोते असे एकुण ६८,४०० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-बळीराम बिराजदार यांनी दि.२९.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३४(१), ३०५ (ए) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## पॉवर ॲण्ड एनर्जी एक्सपर्ट समितीच्या अध्यक्षपदी डॉ.मुरहरी केळे यांची निवड



धाराशिव,(प्रतिनिधी)- महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चर ही राज्यातील उद्योग, व्यापार व कृषी क्षेत्राची शिखर संस्था असून सन २०२७ मध्ये या संस्थेला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. भारतातील निवडक वाणिज्य चेंबर्सपैकी एक असलेल्या आणि शतकपूर्तीकडे वाटचाल करत असलेली ही संस्था राज्यातील नवीन उद्योगांना चालना देणे, त्यांना तांत्रिक, कायदेशीर मार्गदर्शन करणे, उद्योजक, व्यापारी आणि शेतकरी यांच्या हक्कासाठी न्याय मागणे यासारखी अनेक कामे करणार्या नामांकित संस्थेच्या पॉवर ॲण्ड एनर्जी एक्सपर्ट समितीच्या अध्यक्षपदी डॉ. मुरहरी केळे यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज ॲन्ड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवले आहे.

डॉ. मुरहरी केळे यांना उर्जा आणि विद्युत क्षेत्रातील ३५ वर्षपेक्षा जास्त अनुभव असून त्यांनी महाराष्ट्र, मध्यप्रदेश, त्रिपुरा राज्यांतील विद्युत मंडळात संचालक तसेच अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकफ अशा उच्च पदांवर काम केले असून त्यांच्या कार्यकाळात उद्योग आणि कृषी क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. त्यांनी दहा पेक्षा जास्त मराठी आणि इंग्रजी पुस्तके लिहिली असून त्यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर तसेच अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठात शोधनिबंध सादर केले आहेत. त्यांनी अभियांत्रिकी, व्यवस्थापन, कायदा, पत्रकारिता, माहिती तंत्रज्ञान, उर्जा अंकेक्षन आणि मराठी साहित्य या क्षेत्रातील जवळपास १२ पदव्या घेतल्या असून त्यांनी दोन विषयात पीएचडी पदव्या प्राप्त केल्या आहेत. अशा नामांकित व्यक्तीमत्व असलेल्या उच्चविद्याविभूषित आणि उर्जा आणि विद्युत क्षेत्रातील तज्ञ, तसेच वीज क्षेत्रात देशातील पहिले पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप मॉडेल राबवलेल्या डॉ. मुरहरी केळे यांची रवींद्र माणगावे यांनी संस्थेच्या पॉवर ॲण्ड एनर्जी एक्सपर्ट समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करून अभिनंदन केले आहे. त्यांच्या सहकार्याने उद्योग, व्यापार आणि शेती यांच्या विकासासाठी अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्याचे काम करणार असल्याचे तसेच त्यांच्या मार्गदर्शनानुसार सदर समितीमधील अन्य सदस्यांच्या समवेत नियमित बैठकांच्या मधून उपक्रमांचे नियोजन व क्रियान्वयन अपेक्षित असल्याची अपेक्षा चेंबरचे अध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी व्यक्त केली आहे.

## वसंत आश्रमशाळेकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस एक दिवसाचे वेतन

धाराशिव -वसंत प्राथमिक आश्रमशाळा,विद्यानगर (बावी), येथील मुख्याध्यापक,शिक्षकवृंद व सर्व कर्मचारी यांनी सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत आपले एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देणगी म्हणून दिले.

या माध्यमातून शाळेच्या शिक्षक व कर्मचाऱ्यांनी समाजातील गरजू घटकांसाठी मदतीचा हात पुढे करत एकूण रुपये ३३ हजार २५६ रुपये इतकी रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देणगी दिली आहे.

ही देणगी २८ ऑक्टोबर २०२५ रोजी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष,जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव येथील अध्यक्ष तथा वैद्यकीय अधिकारी डॉ. सूरज मोटे यांच्याकडे डिमांड ड्राफ्ट स्वरूपात सुपूर्द करण्यात आली.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष,धाराशिवतर्फे या उदार आणि प्रेरणादायी देणगीबद्दल सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीस दिलेली ही देणगी समाजातील गरजू घटकांसाठी दिलासा ठरणारी असून, वसंत प्राथमिक आश्रमशाळेच्या शिक्षक व कर्मचाऱ्यांनी दाखविलेली ही सामाजिक संवेदनशीलता इतरांसाठी आदर्शवत ठरणारी आहे.

मुख्याध्यापक,शिक्षकवृंद आणि कर्मचारी वर्ग यांना त्यांच्या या सामाजिक व मानवतावादी कार्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून,त्यांच्या पुढील शैक्षणिक,सामाजिक आणि मानवसेवेच्या कार्यांसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥

# लातूर समाचार

## पावसामुळे मराठवाड्यातील शेतकरी पुन्हा संकटात


मराठवाड्यातील शेतकरी हा पाऊस, चक्रीवादळामुळे संकटात सापडला आहे. या पावसाने निर्माण झालेल्या स्थितीत लातूर, बीड, धाराशिव आदि जिल्ह्यातील शेतकऱ्यास पुन्हा संकटात टाकले आहे. लातूर जिल्ह्यात नदीकिनारी उरलेसुरले पीकही वाहून गेले. या पावसामुळे काही भागात रब्बी पेरणीला पुन्हा उशीर होणार आहे. मराठवाड्यातील ४० महसूल मंडळात अतिवृष्टी नोंदविण्यात आली. लातूर जिल्ह्यात १५० ते २०० हेक्टर शिवार पुन्हा पाण्याखाली गेले आहे. रेणापूर तालुक्यातील पळशी येथे सर्वाधिक १९५ मिमी पावसाची नोंद झाली. मंगळवारी रात्रीपासून बुधवारी पहाटेपर्यंत पावसाची 'जोर'धार कायम होती. छत्रपती संभाजीनगर शहरासह मराठवाड्यात सर्वत्र हलका व मध्यम स्वरूपाचा पाऊस बुधवारी पडला. लातूर जिल्ह्यातील रेणापूर तालुक्यात मुसळधार पाऊस झाल्याने रेणा प्रकल्पाचे दरवाजे उघडावे लागले. भंडारवाडी, चुकारवाडी, कामखेडा, धनसरगाव या गावांसह अनेक गावांत पुन्हा पाणी शिरले. पावसाने उघडीप दिल्याने काही ठिकाणी रब्बी पेरणीला सुरुवात करण्यात आली होती. याच शेतकऱ्यांचे पुन्हा नुकसान झाले आहे. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई, परळी, केज, धारुर या तालुक्यांत पावसाचा जोर अधिक होता. धारुर तालुक्यातील वाण नदीला पुन्हा एकदा पूर आला. काही ठिकाणी वेचणीला आलेला कापूस पुन्हा भिजला. अंबाजोगाई तालुक्यातील बरदापूर महसूल मंडलात ११८ मिमी पाऊस नोंदविण्यात आला. धाराशिवमध्येही रात्रभर पाऊस सुरू होता. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यातही अतिवृष्टी नोंदविण्यात आली. अनेक भागांतून उरलेसुरले पीकही वाहून गेले. या पावसामुळे रान दुरुस्त करून रब्बीची पेरणी करण्यास आणखी विलंब लागण्याची शक्यता आहे. वरचेवर मराठवाड्यातील शेतकऱ्यावर संकटाची मालिका संपण्याची चिन्ह दिसून येत नाहीत. त्याच प्रमाणे सरकारची मदत अजूनही काही शेतकऱ्याच्या हाती लागली नाही. विमा हाती लागला नाही. केवळ संकटेच येत आहेत. काही तज्ज्ञांनी आता पाऊस परतीचा मार्गी लागला आहे असे मत व्यक्त केले. निसर्गाच्या संकटापुढे आता हवामान विभागाबरोबर ज्योतिष भाष्य करणारे मागे पडले आहेत. निसर्गाचे संकट भयाण असते आता कोठे जनतेला कळाले असेल. निसर्ग कोणाचे एकत नाही किंवा त्याच्यापुढे कोणाचे काही चालत नाही हे दिसून आले. त्यामुळे निसर्गाला सतत घाबरले पाहिजे. मराठवाड्यातील शेतकरी जे नदीकाठचे आहेत. त्यांनी सोयाबिनची बनीम वाहून गेली आहे. इतरही शेतकऱ्याच्या सोयाबिनच्या बनीम वाहून गेल्या आहेत. सर्वात मोठे संकट अशा शेतकऱ्यावर ओढावले आहे. काही झाले तरी राज्यात सर्वाधिक संकट मराठवाड्यातील शेतकऱ्यावर कोसळले आहे. त्यामुळे राज्य सरकारने मराठवाड्यातील शेतकऱ्यास अधिक मदतीचा हात पुढे केला पाहिजे. मदत ही भरीव असली पाहिजे. तुटपुंजी असू नये. त्याच प्रमाणे राज्यात यावर्षी शेतकरी आर्थिकदृष्ट्या कंगाल झाला आहे. शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. जमीनीवर पिक तर हाताचे गेले मात्र जमीनीवरील माती सुद्धा वाहुन गेली आहे. त्यामुळे पुढील उत्पादन घेण्यासाठी मोठे संकट आहे. माती शेतात टाकणे शक्य नाही. खडकाल जमीन निर्माण झाल्याने काय पेरावे हे मोठे संकट आहे. त्यात मराठवाड्यात वारंवार शेतकऱ्यावर संकटे येत आहेत. यावर मुकाबला करण्यासाठी आता वेगळे प्रयत्नाची मोठी गरज आहे. त्यामुळे राज्य शासनाने संकट निवारण समिती गठीत करण्याची गरज आहे. त्याच प्रमाणे राज्यातील बहुतांशी शेतकऱ्याचा व्यवसाय हा शेती आहे. ग्रामीण भागात तर शेती शिवाय दुसरा उद्योग नाही. शेतीत मोठ्या प्रमाणात धान्य पिकविले जाते म्हणूनच आनंदाने सर्वजन खातात. शेतकरी काबडकष्ठ करतो म्हणून बाकी निवांत जीवन जगत असतात. ही बाब नजरेआड करून चालणार नाही. त्यामुळे शेतकऱ्याकडे गांर्भीयाने पाहाण्याची वेळ आली आहे. शेतकरी सध्याला चोहोबाजूने संकटात सापडला आहे. त्यात आता पाऊस राज्यातून परतणार असे सांगत असताना पुन्हा पावसाचा तडाखा बसत आहे. राज्यात दोनच ऋतू दिसून येतात की काय असे वाटायला लागले आहे. सध्याच्या महिण्यात थंडी असते. दिवाळीत थंडी असते. ती दिसून येत नाही तर पावसाळा म्हणजे जून सारखी स्थिती निर्माण झाली आहे. पावसाळा हा नुकसान करणारा ठरत आहे. अचानक पाऊस पडतो व शेतकऱ्याचे मोठे नुकसान करीत आहे. त्यामुळे शेतकरी आता हवालदिल झाला आहे. त्याच प्रमाणे सरकारची मदत ही उशीरा हाती मिळणार आहे असे दिसून येते. अजून पंचनामे चालूच आहेत. वरचेवर पावसाचे संकट निर्माण होत आहे. त्यामुळे पंचनाम्यास विलंब लागणार आहे. वास्तविक सरकारने नुकसान ग्रस्त शेतकऱ्यास दिवाळीपुर्वी मदत मिळणार असे वक्तव्य केले होते. दिवाळी झाली तरी अजून शेतकऱ्याच्या खात्यात नुकसान भरपाईची रक्कम जमा झाली नाही. त्यामुळे नाराजगी मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. पाऊस मोठा व सतत दोन-दिवस राहात आहे. त्यामुळे राणात पाणीच पाणी झाले आहे. काहीनी सोयाबिन काढून गंज रचली आहे ती बनीम वाहून गेली आहे. आता पदरात काहीच पडेल असे वाटत नाही. त्यामुळे एकमेव मदत ही राज्यसरकारने करणे अपेक्षित आहे. शेतकरी हा संकटात सापडला आहे हे सर्वजन कबुल करतात मात्र त्यांना देण्यात येणारी मदतीस उशीर होत आहे. सरकार मदत करणार यावर शेतकऱ्याचा विश्वास आहे. कधी मदत करणार हा प्रश्न आहे. सरकारने जाहिर केलेली मदत शेतकऱ्याच्या मदरात टाकणे आवश्यक आहे. केवळ घोषणा नको. शेतकरी हा पोशिंदा आहे. तो वेतन आयोगाची मागणी करीत नाही. त्याला मानधन महिण्याला मिळत नाही. तो जगलाच तर खायला मिळणार आहे ही वस्तूस्थिती आहे. त्यामुळे शेतकऱ्याला भरीव मदतीची गरज आहे ती केली पाहिजे. मराठवाड्यातील शेतकऱ्यावर मोठे संकट आले आहे. अनेक महसुल मंडळात पाणीच पाणी झाले आहे. त्यामुळे विशेष बाब म्हणून मराठवाड्यातील शेतकऱ्यासाठी विशेष आर्थिक पॅकेजची गरज आहे. दिवाळी संपली आहे त्यामुळे तातडीने मदत करणे अपेक्षित आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यावर संकट आली हे उघड आहे त्यामुळे राज्य सरकारने तातडीने मदत केली पाहिजे.

# सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंती निमित्त 'राष्ट्रीय एकता दिवस' आणि 'भारत पर्व २०२५'

## राष्ट्रीय एकात्मता वाढवून विविधतेत एकतेचे दर्शन घडविणारा सोहळा

**लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ३१ ऑक्टोबर हा राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो. भारताची एकता, अखंडता आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक म्हणून या दिवसाकडे पाहिले जाते. यानिमित्त देशभर विविध कार्यक्रमांचे ३० ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर दरम्यान आयोजन करण्यात आले असून 'राष्ट्रीय एकता दिवस' आणि 'भारत पर्व २०२५' हे या कार्यक्रमाचा भाग आहे.**

भारताचे पहिले उपपंतप्रधान आणि पहिले गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी स्वातंत्र्यानंतर संस्थानांचे विलिनीकरण करून देशाची भौगोलिक आणि राजकीय एकता साध्य केली. कणखर निर्णयक्षमता, मुत्सद्देगिरी, नैतिक धैर्य आणि देशप्रेम, राष्ट्रीय एक्य ही त्यांची गुणात्मक वैशिष्ट्ये होती. त्यांच्या धैर्यवान नेतृत्वाने आणि मुत्सद्दी दृष्टिकोनाने भारताच्या अखंडतेचा पाया रचला. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ गुजरातमध्ये उभारलेला १८२ मीटर उंच 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' आज जगातील सर्वाधिक उंच पुतळा असून, २०२४-२५ या वर्षात तब्बल ६०.५९ लाख पर्यटकांनी येथे भेट दिली आहे.



**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून राष्ट्रीय उत्सव**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमाचा उद्देश देशातील युवक, स्वयंसेवक आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये राष्ट्रनिर्माणाची भावना जागृत करणे हा आहे. जनभागीदारीद्वारे राष्ट्रनिर्माण करण्यासाठी या उपक्रमाद्वारे युवक, स्वयंसेवक, नागरिक आणि समाजातील सर्व घटकांना राष्ट्रनिर्माणाच्या प्रक्रियेत सक्रिय सहभागी होण्यासाठी प्रधानमंत्री यांच्या प्रोत्साहनातून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. लोहपुरूष सरदार पटेल यांच्या कार्याची ओळख युवकांपर्यंत पोहोचावी यासाठी राष्ट्रीय पातळीवर तसेच राज्य पातळीवर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत राष्ट्रीय पदयात्रेचा शुभारंभ २६ नोव्हेंबर रोजी करमसाड, अहमदाबाद (सरदार पटेल यांचे जन्मस्थान) येथून सुरू होऊन स्टॅच्यू ऑफ युनिटी, केवडिया येथे संपन्न होणार आहे. या प्रवासात युवक, माय भारत स्वयंसेवक, एनएसएस व यंग लीडर्स विविध सामाजिक विकास उपक्रमांमध्ये सहभागी होतील. या मार्गातील गावे, जिल्ह्यांच्या १५० ठिकाणी लोहपुरूष सरदार पटेल यांच्या जीवनावर आधारित प्रदर्शने, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सरदार गाथा सत्रांचे आयोजन करण्यात येईल. ज्यामध्ये सरदार पटेल यांच्या प्रेरणादायी कार्यावर प्रकाश टाकण्यात येणार आहे.

या उपक्रमात सहभागी होण्यासाठी माय भारत पोर्टलवर https://mybharat.gov.in/pages/unityšmarch ऑनलाईन पद्धतीने नोंदणी करता येणार आहे. युवक व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय भारत सरकारच्या https://mybharat.gov.in या संकेतस्थळावर अधिक माहिती उपलब्ध असून, देशातील सर्व युवकांना या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी 'सरदार१५० एकता मोहिमे'त सहभागी होण्याचे आवाहन शासनामार्फत करण्यात आले आहे.

**भारत पर्व अंतर्गत राज्यात विविध उपक्रम**

महाराष्ट्रात ३१ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. युवकांना लोहपुरुषांच्या विचारांची प्रेरणा मिळून सामाजिक बांधिलकी अधिक बळकट होईल, या विचारातून क्रीडा मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी या कार्यक्रमात जास्तीत जास्त युवकांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

जिल्हा प्रशासन, क्रीडा विभाग, माय भारत, एनएसएस, एनसीसी तसेच स्थानिक प्रशासन संयुक्तिकरित्या जिल्हास्तरीय पदयात्रा काढणार असून प्रत्येक जिल्ह्यात ८ ते १० कि.मी. अंतराच्या जिल्हास्तरीय पदयात्रा, निबंध आणि वादविवाद स्पर्धा, सरदार पटेल यांच्या जीवनावर चर्चासत्रे आणि पथनाट्ये, नशा मुक्ती भारत प्रतिज्ञा, योग आणि आरोग्य शिबिरे, स्वच्छता मोहीम, संस्था स्वदेशी मेळावे, आत्मनिर्भर भारत प्रतिज्ञा, सांस्कृतिक सादरीकरण अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक राज्याद्वारे अशा अभिनव स्पर्धा आणि कार्यक्रमांतून देशभर सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात येणार आहे.

**स्वराज्य : एकतेचा धागा**

गुजरात येथे राष्ट्रीय संचलनात महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे यावर्षी स्वराज्य : एकतेचा धागा या संकल्पनेवर आधारित चित्ररथ साकारण्यात येणार आहे. या माध्यमातून राज्याच्या वैभवशाली इतिहासाची आणि एकतेची झलक दर्शविण्यात येणार आहे. या चित्ररथासोबत १४ कलाकारांचा चमू सांस्कृतिक सादरीकरण करणार आहे. या महोत्सवाचा मुख्य कार्यक्रम ७ आणि ८ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडेल. या सांस्कृतिक कार्यक्रमात राज्यातील समृद्ध लोकपरंपरेचे दर्शन घडविण्साठी गोंधळ, नृत्य, कोळी नृत्य, लावणी तसेच वारी परंपरेवर आधारित सादरीकरणे यांचा समावेश असलेले १५ ते २० कलाकारांचे पथक सहभागी होणार आहे. या उपक्रमांद्वारे राज्याचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि लोकपरंपरेचे वैभव राष्ट्रीय तसेच आंतरराज्यीय पातळीवर प्रभावीपणे सादर होणार आहे.

**गुजरातमध्ये भव्य भारत पर्व सोहळा**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून राष्ट्रीय एकता दिनाचा मुख्य भव्य सोहळा गुजरातमधील एकता नगर (जिल्हा नर्मदा) येथे करण्यात येणार आहे. यावेळी भव्य संचलन आणि सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. संचलनादरम्यान सीएपीएफ आणि विविध राज्यांच्या पोलिस तुकड्या त्यांच्या शौर्य, शिस्त आणि कौशल्याचे प्रदर्शन करतील. या संचलनात बीएसएफ, सीआरपीएफ, सीआयएसएफ, आयटीबीपी, एसएसबी, तसेच महाराष्ट्र, पंजाब, केरळ, जम्मू-काश्मीर, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, ओडिशा, आसाम, त्रिपुरा आणि छत्तीसगड राज्यांच्या पोलीस तुकड्या सहभागी होतील. घोडदळ, उंटदळ, भारतीय श्वानांच्या प्रजाती, तसेच विविध मार्शल आर्ट्स आणि निःशस्त्र लढाऊ कवायतींचे सादरीकरण होणार आहे. केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाच्यावतीने आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात ९०० कलाकार भारतीय शास्त्रीय नृत्याद्वारे देशाच्या सांस्कृतिक वैविध्याचा आणि राष्ट्रीय एकतेचा संदेश देणार आहेत.

**'भारत पर्व' मधून विविधतेत एकतेचे दर्शन**

१ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत होणाऱ्या या भव्य सोहळ्यात विविध राज्यांतील सांस्कृतिक कार्यक्रम, हस्तकलेच्या वस्तूंचे प्रदर्शन आणि खाद्य महोत्सवाचा समावेश करण्यात आला आहे. १५ नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा जयंती साजरी करून या महोत्सवाचा समारोप करण्यात येणार आहे. यावेळी आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात, आपल्या संस्कृतीची समृद्ध विविधता आणि राष्ट्रीय एकतेला उजाळा देणारे ९०० कलाकार भारतीय शास्त्रीय नृत्य सादर करणार आहेत.

गुजरात येथे १८०० चौरस मीटर अशा भव्य परिसरात गुजरात शासनाच्या पर्यटन विभागामार्फत सिंगल डोम (जर्मन हँगर स्ट्रक्चर) उभारण्यात येणार आहे. भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाकडून प्रदर्शनासाठी राज्ये व केंद्रशासित प्रदेश आणि केंद्रीय मंत्रालयांसाठी थीम पॅव्हेलियनसाठी स्वतंत्र जागा निश्चित करण्यात येणार आहे. थीम पॅव्हेलियन्साठी हँगर स्ट्रक्चरची उभारणी करण्यात येणार असून प्रत्येक पॅव्हेलियनचे परिमाण पाच मीटर ु पाच मीटर इतके असणार आहे.

**विविध खाद्यपदार्थांचे ४५ तसेच हस्तकला वस्तू प्रदर्शनाचे ५५ असे १०० स्टॉल्स असणार आहेत.**

हस्तकला वस्तूंचे स्टॉल केंद्र शासनाच्या हस्ततंत्र व हस्तकला विकास आयुक्तालयामार्फत तर पाच स्टॉल हस्तकला आदिवासी विकास विभागामार्फत उभारण्यात येणार आहेत. १०.८ चौरस मीटर परिसरात हे स्टॉल असतील याचे व्यवस्थापन गुजरात सरकारच्या पर्यटन विभागामार्फत केले जाणार आहे.

४५ स्टॉल्स खाद्यपदार्थांसाठी असणार आहेत. यापैकी पाच दालने ही आदिवासी विकास विभागामार्फत उभारण्यात येणार आहेत.

तर ३० स्टॉल हे नॅशनल असोसिएशन ऑफ स्ट्रीट वेंडर ऑफ इंडिया यांच्यामार्फत उभारण्यात येणार असून, उर्वरित पर्यटन विकास विभागामार्फत उभारण्यात येणार आहेत.

स्टुडिओ किचनची उभारणी आयएचएम गांधीनगरतर्फे भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाच्या समन्वयाने १ ते १५ नोव्हेंबर या कालावधीत करण्यात येईल. पर्यटन विभागामार्फत येथे येणाऱ्या वस्तू व खाद्यपदार्थ विक्रेत्यांसाठी राहण्याची तात्पुरती सोय करण्यात आली आहे. पर्यटक आणि सहभागी युवकांना विविध वस्तूंचे प्रदर्शन व विक्री, खाद्य पदार्थांचे स्टॉल, विविध राज्यांची संस्कृती दर्शविणारे केंद्र उभारून विविधतेत एकतेचे दर्शन या सोहळ्याच्या माध्यमातून घडणार आहे.

**एक भारत, श्रेष्ठ भारताच्या संकल्पनेला नवा उत्साह**

३१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश केंद्र सरकारच्या निर्देशाप्रमाणे एकावेळी दोन राज्ये अशापद्धतीने भारत पर्व अंतर्गत एक भारत श्रेष्ठ भारत कार्यक्रमाचे आयोजन करणार आहे.

**-श्रद्धा मेश्राम**
विभागीय संपर्क अधिकारी
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई -३२

# भारताची स्टील फ्रेम – अखिल भारतीय सेवा आणि राष्ट्रनिर्माण?

एखाद्या राष्ट्राचे मूल्यमापन केवळ त्याच्या भूगोलाने नव्हे तर त्याच्या संस्थांची कार्यक्षमता, निष्पक्षता आणि लवचिकतेने केली जाते. स्वातंत्र्योत्तर भारतात, अखिल भारतीय सेवा (आयएएस, आयपीएस आणि आयएफओएस) या प्रशासनाच्या कण्याप्रमाणे कार्य करत आहेत, या सेवांनी केंद्र आणि राज्यांमधील सुसंवाद सुनिश्चित केला आणि शासन व नागरिक यांच्यातील दुवा साधला. या सेवांचे वेगवेगळ्या क्षेत्रात केलेले योगदान हे दर्शवते की सरदार वल्लभभाई पटेल यांची दृष्टी आजही एका मजबूत, एकसंघ आणि प्रतिसादक्षम राष्ट्राच्या कार्यपद्धतीस दिशा देणारी आहे.

**स्टील फ्रेमचा जन्म**

स्वातंत्र्यानंतरच्या राष्ट्राची स्थिती ओळखून, सरदार वल्लभभाई पटेल यांनी व्यावसायिक, निष्पक्ष आणि कार्यक्षम नागरी सेवांची आवश्यकता अधोरेखित केली. हीच स्टील फ्रेम केंद्राला विविध राज्यांशी जोडेल, धोरणांची समतोल अंमलबजावणी करेल आणि कायदा व सुव्यवस्था राखून आर्थिक व सामाजिक विकासाला चालना देईल. हे निक्षून सांगितले. सरदार वल्लभभाई पटेल यांना ठाऊक होते की केवळ राजकीय एकता पुरेशी नाही; मजबूत संस्था हाच तत्त्वांना व्यवहारात उतरवण्याचा आणि शांतता व प्रगती टिकवून ठेवण्याचा पाया आहे.

**प्रशासकीय एकसंधता आणि स्थैर्य**

अखिल भारतीय सेवांचे अधिकारी धोरणे आणि जनतेमधील कार्यक्षम दुवा म्हणून देशभरातील जिल्ह्यांमध्ये आणि राज्यांमध्ये कार्यरत असतात, निवडणुका पार पाडणे, सामाजिक कल्याण योजना राबविणे, कायद्याचे राज्य आणि राष्ट्रीय एकात्मता टिकवणे या सर्व कार्यांमध्ये त्यांची भूमिका महत्त्वाची ठरते. प्रत्येक जिल्ह्यात त्यांची उपस्थिती शासनाला केवळ शहरी केंद्रांपुरते मर्यादित ठेवत नाही, तर प्रत्येक नागरिकाला राष्ट्रनिर्माणाच्या प्रवासात सहभागी बनवते. अनेक भागांमध्ये अधिकारी आपत्ती व्यवस्थापन, स्थानिक नियोजन आणि सामाजिक उपक्रमांमध्येही नेतृत्व करतात, ज्यातून या स्टील फ्रेमचा बहुआयामी प्रभाव दिसतो.

**संकट व्यवस्थापन आणि राष्ट्रनिर्माण**

नैसर्गिक आपत्ती असो, सामाजिक अशांतता असो किंवा महामारी, अखिल भारतीय सेवांचे अधिकारी धोरणे आणि योजनांच्या प्रभावी अमंलबजावणीत सातत्य, समन्वय आणि नेतृत्व प्रदान करतात. केंद्राच्या धोरणांना स्थानिक वास्तवाशी सुसंगत ठेवण्याची त्यांची क्षमता भारताला अंतर्गत आव्हानांचा सामना करण्यास आणि विविधतेत एकता टिकवण्यास सक्षम करते. आसाममधील पुरापासून गुजरातमधील भूकंपापर्यंत, संकट काळातील त्यांचे नेतृत्व समुदायांना स्थिर ठेवते आणि आवश्यक सेवांची सातत्याने पूर्तता सुनिश्चित करते.

**राष्ट्रीय मूल्यांची रुजवण**

प्रशिक्षण, प्रशासन आणि नागरिकांशी दैनंदिन संवादाच्या माध्यमातून, अखिल भारतीय सेवा सामायिक जबाबदारीची आणि राष्ट्रीय ध्येयाची भावना वाढवतात. अधिकारी विविध गटांमध्ये मध्यस्थी करतात, वाद सोडवतात आणि सर्वसमावेशक धोरणे अंमलात आणतात, ज्यामुळे एकात्मता आणि शासनावर विश्वास दृढ होतो. या दैनंदिन कार्यातून सामाजिक सुसंवाद वाढतो, कायद्याचा आदर, न्याय आणि सामायिक उद्दिष्टांची भावना बळकट होते – जी एका एकसंध राष्ट्राची पायाभूत मूल्ये आहेत.

अखिल भारतीय सेवा या सरदार पटेल यांच्या या विश्वासाचे जिवंत उदाहरण आहे. मजबूत संस्था हे एकसंघ भारताचे अधिष्ठान आहेत. त्या दृष्टीला कृतीत, धोरणांना व्यवहारात आणि विचारसरणीला राष्ट्रीय एकात्मतेच्या ठोस रूपात परिवर्तित करतात.

राष्ट्रीय एकता दिनाच्या निमित्ताने, राष्ट्रनिर्माणातील त्यांचे योगदान कोणत्याही राजकीय किंवा सांस्कृतिक प्रयत्नाइतकेच महत्त्वाचे आहे. एकात्मता, निष्पक्षता आणि राष्ट्रीय सेवांचे आदर्श देशाच्या प्रत्येक कोपऱ्यात जिवंत राहतील, हे अखिल भारतीय सेवा सुनिश्चित करतात.

**श्री.राजू धोत्रे,**
विभागीय संपर्क अधिकारी
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई -३२

# हळद घातलेले दूध की हळदीचं पाणी काय चांगले?




हळद दुधात किंवा पाण्यात घालून दोन्ही प्रकारे घेतली तरी फायदेशीर ठरते, पण शरीरावर होणारा परिणाम वेगवेगळा असतो. धर्मशिला नारायणा हॉस्पिटलच्या सीनियर डायटिशियन पायल शर्मा यांच्या मते, वजन कमी करायचं असेल किंवा शरीर डिटॉक्स करायचं असेल, तर हळदीचं पाणी योग्य आहे. तर हाडं मजबूत करायची, इम्युनिटी वाढवायची किंवा थंडी-खोकला कमी करायचा असेल, तर हळदीचं दूध घ्यावं.

दुधात असलेलं कॅल्शियम आणि व्हिटामिन्स हळदीसोबत शरीरात पटकन शोषलं जातं आणि हाडं मजबूत होतात. हळदीचं दूध रात्री झोपण्यापूर्वी घेणं उत्तम मानलं जातं.

**हळदीचे मुख्य फायदे**

हळदीमधील कर्क्युमिन हृदयविकाराचा धोका कमी करतं. मेंदूच्या पेशींची वाढ सुधारतं आणि शरीरातील सूज म्हणजेच इंफ्लमेशन कमी करतं. शरीरातले फ्री रॅडिकल्स दूर करून त्वचा आणि पेशींचं संरक्षण करतं. संधिवातासारख्या आजारांमध्येही आराम देतं.

**हळदीच्या दुधाचे फायदे**

स्ट्रेस कमी करतं आणि झोप सुधारतं. हाडं व स्नायू मजबूत ठेवतं. यातील कॅल्शियम, व्हिटामिन बी१२ आणि डीमुळे शरीरात हिमोग्लोबिन वाढतं.

# मानवी शारीरिक स्वास्थ्याची त्रिसूत्री



पूर्वी महिष्मती नगरीत एक श्रीमंत व्यापारी राहत होता. सदैव व्यवसायात व्यग्र असलेल्या या व्यापाऱ्याला अस्वस्थ वाटू लागलं म्हणून त्याने नगरातल्या वैद्याला बोलावलं. वैद्यांनी त्याला उपचारासाठी दुसऱ्या दिवशी सकाळी पायी यायला सांगितलं. त्याप्रमाणे व्यापारी दुसऱ्या दिवशी पहाटे चालत वैद्यांकडे गेला आणि म्हणाला, 'मला अस्वस्थ वाटत आहे. आपण लवकर औषध द्या. मला पुष्कळ कामं आहेत.' त्यावर वैद्य म्हणाले, 'तुझी सगळी कामं उरकून, नदीवर स्नान करून माझ्याकडे परत ये.' त्यानुसार व्यापारी परत वैद्यांकडे आला. थकून आलेल्या व्यापाऱ्याला वैद्यांनी ताजी न्याहारी खायला दिली. नंतर जवळच्या उद्यानात, झोपाळ्यावर बसून वैद्यांनी व्यापाऱ्याची विचारपूस करायला सुरवात केली. वैद्यांशी बोलता बोलता व्यापाऱ्याला झोप लागली. काही काळानं जागं झाल्यावर संकोचलेल्या व्यापाऱ्यानं क्षमा मागितली आणि खूप दिवसात अशी शांत झोप अनुभवली नाही असं म्हणाला. माझ्या अस्वास्थ्याकरता उपचार काय असं विचारल्यावर वैद्य म्हणाले, 'उपचार तर पूर्ण झाले आहेत.' व्यापाऱ्याला आश्चर्य वाटलं. त्यावर वैद्य म्हणाले सकाळच्या कोवळ्या उन्हातला विहार, सात्त्विक अन्न आणि योग्य विश्रांती हेच आपलं औषध आहे.

कामाच्या धबडग्यात व्यापारी योग्य आहार, विहार आणि विश्रांती ही आरोग्यासाठी उपयुक्त असलेली तीन सूत्रं विसरला होता. वैद्यांनी त्याला केवळ त्यांची आठवण करून दिली आणि अनुभवही दिला.सध्याच्या काळात आपलं जगणं काही व्यापाऱ्यापेक्षा वेगळं नाही. शरीरस्वास्थ्यासाठी आवश्यक असलेली आहार, विहार आणि विश्रांती ही त्रिसूत्री आपण विसरलो आहोत. स्वास्थ्य म्हणजे नेमकं काय? केवळ शरीर सुदृढ असलं म्हणजे स्वास्थ्य आहे असं म्हणता येतं का? या प्रश्नांचे उत्तर शोधण्यासाठी स्वास्थ्य शब्दाचा नेमका अर्थ पाहू. स्वास्थ्य शब्दात मूळ शब्द 'स्वस्थ' असा आहे. स्वस्थ शब्दाची व्युत्पत्ती 'स्वस्मिन् तिष्ठति' म्हणजे स्वतःमध्येच स्थिर असणं अशी आहे. जो शरीरानं आणि मनानंही दृढ आणि स्थिर आहे तो स्वस्थ. नेहमी स्वस्थ असण्याची ही अवस्था म्हणजे स्वास्थ्य. थोडक्यात, स्वास्थ्य म्हणजे शारीरिक आणि मानसिक स्थैर्य. प्रस्तुत लेखात आपण शारीरिक स्वास्थ्याचा विचार करणार आहोत. शारीरिक स्वास्थ्य प्रामुख्यानं तीन सूत्रांवर आधारित आहे. आहार, विहार, आणि विश्रांती.

१. आहार : आहाराविषयी विवेचन लेख क्रमांक ५ मध्ये केलं आहे. तरीही थोडक्यात सांगायचं तर आहार सात्त्विक म्हणजे ताजा, आनंददायी, शरीराकरता पोषक असावा. सीमित म्हणजे योग्य प्रमाणात असावा. आपल्या खाण्याच्या क्षमतेच्या अर्धा भाग अन्न, पाव भाग पाणी आणि पाव भाग वायुसंचारासाठी मोकळा असावा. आहार संतुलित म्हणजे गोड, तिखट, कडू, तुरट, आंबट आणि खारट या सहा रसांचं योग्य प्रमाण असलेला, योग्य प्रमाणात जीवनसत्त्वं, प्रथिनं, कर्बोदकं इत्यादींनी युक्त असावा.

२. विहार : स्वास्थ्यासाठी आहाराला विहाराचीही जोड द्यायला हवी. विहार शब्दाचा अर्थ फिरणं तसेच खेळ, क्रीडा असाही आहे. दररोज नियमितपणे चालणं हा व्यायाम आहेच पण विहार शब्दाचा अर्थ व्यापक दृष्टीनं लक्षात घेतला तर शरीर सुदृढ राहण्यासाठी शरीराच्या योग्य हालचाली म्हणजेच व्यायाम करण्यालादेखील विहार म्हणता येईल. वस्तुतः दररोज आपण घरातील, कार्यालयातील अनेक कामं पार पाडत असतो. तेव्हा आपले भरपूर शारीरिक श्रम होतात; परंतु ते व्यायाम (एशीलळीश) नसून परिश्रम (एशींळेप) असतात. परिश्रमांमुळे थकवा येतो. मात्र चालणं किंवा योगासन करणं अशा व्यायामामुळे थकवा दूर होऊन ताजतवानं वाटतं. असे व्यायाम करणं म्हणजे विहार होय. व्यायामामुळे शरीर स्वास्थ्याबरोबरच आनंदही मिळतो. म्हणूनच दिवसातून थोडा वेळ तरी विहारासाठी राखून ठेवणं आवश्यक आहे.

३. विश्रांती : शारीरिक स्वास्थ्याचं तिसरं सूत्र म्हणजे विश्रांती. भरपूर वेळ झोप घेणं किंवा काहीही हालचाल न करणं म्हणजे विश्रांती नाही. उलट अधिक झोप घेतली तर अधिक आळस येतो, काम करण्यासाठी ऊर्जा आणि उत्साह राहात नाही. म्हणून योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात निद्रा घेणं, काम करताना काही क्षण शांत बसणं म्हणजे विश्रांती होय. विश्रांतीनं आळस न येता काम करायचा उत्साह वाढतो. रात्री आठ तास झोप घेणं आरोग्याच्या दृष्टीनं आवश्यक आहे. योग्य प्रमाणात घेतलेल्या निद्रेमुळे शरीराची झीज भरून निघतेच पण मनही कामं करण्यासाठी ताजतवानं होतं. योग आणि शारीरिक स्वास्थ्याचा घनिष्ठ संबंध आहे. योगासनं करताना ठराविक क्रमानं, संथ गतीनं आपल्या क्षमतेनुसार शरीराच्या योग्य हालचाली करून आसनाची अंतिम स्थिती गाठली जाते. या हालचाली लक्ष देऊन केल्यामुळे मनाची एकाग्रता वाढते. मन शांत होतं. प्रत्येक आसनानंतर काही क्षण विश्रांती घ्यायची असते त्यामुळे आसनांमध्ये कृती आणि विश्रांती यांचं योग्य संतुलन असतं. योगामध्ये शिथिलीकरणाला महत्त्व आहे. म्हणूनच योगासनं केल्यानंतर उत्साह वाटतो. स्नायू शिथिल होतात. दीर्घकाळ योगसाधना केल्यानं मनावरही नियंत्रण येतं ज्यामुळे आपोआपच आहारही नियंत्रित व्हायला मदत होते. अशा रीतीनं शरीर स्वास्थ्याची त्रिसूत्री योगसाधनेद्वारे सिद्धीस नेता येते.

# भाग्यश्रीचा फिटनेस मंत्र: वजन कमी करण्यासाठी बुलेटप्रूफ कॉफीची शिफारस!

मुंबई: आपल्या फिटनेस आणि सुंदर त्वचेसाठी नेहमी चर्चेत असणारी बॉलिवूड अभिनेत्री भाग्यश्री हिने नुकताच तिच्या चाहत्यांसाठी एक महत्त्वाचा फिटनेस टीप शेअर केला आहे. वजन कमी (थशळसहीं डीं) करण्यासाठी आणि पोटावरील चरबी (इशश्रश्रू त्रीं) कमी करण्यासाठी भाग्यश्रीने 'बुलेटप्रूफ कॉफी' (ईश्र-श्रशींषि उेषषशश) पिण्याची शिफारस केली आहे.

भाग्यश्रीची 'पॉवर कॉफी'

अभिनेत्री भाग्यश्री तिच्या सोशल मीडियावरील 'ट्यूजडे टीप विथ बी' या मालिकेत नियमितपणे फिटनेस आणि आरोग्यविषयक टिप्स देत असते. दिवाळी आणि इतर सणांदरम्यान झालेल्या अति खाण्यापिण्यामुळे वाढलेल्या वजनावर नियंत्रण मिळवण्यासाठी तिने बुलेटप्रूफ कॉफीचा उपाय सांगितला आहे.



भाग्यश्रीच्या मते, सकाळी सर्वात आधी उपाशीपोटी बुलेटप्रूफ कॉफीचे सेवन करणे खूप चांगले आहे. तिने दावा केला आहे की ही कॉफी पिण्याचे अनेक फायदे आहेत. दिवसभर काम करण्यासाठी त्वरित आणि टिकणारी ऊर्जा मिळते. पचनसंस्थेचे आरोग्य सुधारते. मानसिक स्पष्टता आणि स्मरणशक्ती वाढवते. पोट भरल्याची भावना देते, ज्यामुळे भूक नियंत्रित राहते आणि वजन कमी करण्यास मदत करते. बुलेटप्रूफ कॉफी कशी बनवायची?

भाग्यश्रीने तिच्या चाहत्यांसाठी ही खास कॉफी बनवण्याची सोपी पद्धत देखील सांगितली आहे:एका कपात गरम पाणी घ्या. त्यात एक चमचा कॉफी पावडर (उेषषशश झ्रेवशी) घाला.

आता त्यात एक चमचा शुद्ध साजूक तूप (-२ उु ऋह्णशश) किंवा ग्रास-फेड बटर (त्र्रीरी-षशव ईीींशी) घाला.

हे सर्व मिश्रण एकत्र करून तुमची बुलेटप्रूफ कॉफी तयार करा.बुलेटप्रूफ कॉफी म्हणजे काय? बुलेटप्रूफ कॉफी हे एक उच्च-फॅट आणि कमी-कार्ब पेय आहे. ही कॉफी साधारणपणे ब्लॅक कॉफी, ग्रास-फेड (त्र्रीरी-षशव) अनसॉल्टेड बटर आणि एमसीटी (चउढ तेल एकत्र करून बनवली जाते.

# मराठवाड्यात सौदेबाजीचे प्रदर्शन

**डॉ. अभयकुमार दांडगे**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा शताब्दी महोत्सव नुकताच पार पडला. त्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अनेक कार्यकर्त्यांनी महाविद्यालय स्तरावर शाखा स्थापन करण्यासाठी मोहीम राबविली; परंतु त्या मोहिमेला मराठवाड्यातून काही जिल्ह्यात विरोध झाला. काही विद्यार्थी संघटनांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या त्या मोहिमा बंद पाडण्याचा प्रयत्न केला. नांदेडमध्ये भाजपचे खासदार अशोक चव्हाण यांच्या संस्थेतील एका प्रसिद्ध महाविद्यालयासमोर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विद्यार्थी शाखेतर्फे विद्यार्थी संघटना वाढविण्यासाठी टाकलेला तंबू काही तासातच काढावयास लावण्यात आला. हा प्रकार कोणी केला? याचीही वरिष्ठांकडून चौकशी होणे आवश्यक आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये वंचित बहुजन आघाडीने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विरुद्ध मोठा मोर्चा काढला. या मोर्चातून विषारी टीका करण्यात आली. जातीपातीचे राजकारण करून फूट पाडण्याचा प्रकार मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात सुरू आहे. या गोष्टीला समाजातील अनेकजण बळी देखील पडत आहेत. ही भविष्यात चिंतेची बाब मानली जात आहे. मराठवाड्यातील हा मोर्चा चर्चेचा विषय ठरला. शासनाविरुद्ध तसेच सत्ताधाऱ्याविरुद्ध जेव्हा-जेव्हा मोर्चा निघतो तेव्हा त्या मोर्चा मागे एक छुपी शक्ती असते. त्या छुप्या शक्तीचा शोध घेणे आवश्यक आहे. एकीकडे बच्चू कडू यांचे आंदोलन शेतकऱ्यांना सोबत घेऊन होत आहे. त्या आंदोलनात देखील मराठवाड्यातील अनेक शेतकऱ्यांचा समावेश आहे. एवढेच नव्हे तर शेतकऱ्यांचे अनेक नेते त्या आंदोलनात सहभागी आहेत. शेतकरी, मराठा विरुद्ध ओबीसी असे आंदोलन उभारून काही राजकीय पक्ष स्वतःची पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत.

स्वतःच्या शक्तीचे प्रदर्शन करून अनेक नेते शासनासोबत सौदेबाजी करत असतात. हे प्रकार उघडपणे होत नसले तरी मुंबईत गेल्यावर थेट मुख्यमंत्र्यांसोबत चर्चेच्या नावाखाली अशा प्रकारे दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जातो. नांदेडमध्ये देखील 'आरक्षण टिकविण्यासाठी सत्ता हातात द्या', असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केले. त्यांच्यासमवेत ओबीसीचे लक्ष्मण हाके हे देखील उपस्थित होते. ओबीसींचा एल्गार मोर्चा या नावाखाली नांदेडमध्ये आंदोलन करण्यात आले. ओबीसी, भटके विमुक्त, बलुतेदार तसेच इतर मागासवर्गीय समन्वय समितीच्यावतीने नांदेडमध्ये मोर्चा



काढण्यात आला. महाराष्ट्र शासनाने २ सप्टेंबर २०२५ रोजी काढलेला शासनादेश रद्द करावा, या मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले. मागणी पूर्ण नाही झाली तर नागपूर किंवा मुंबईला मोठे आंदोलन उभारावे लागेल असे ओबीसी नेते लक्ष्मण हाके यावेळी म्हणाले. ओबीसी समाजाला तेलंगणात ६२% आरक्षण लागू आहे. तर महाराष्ट्रात केवळ २७% च का? असा प्रश्न शासनाला विचारा अशी चिथावणीदेखील या आंदोलनातून देण्यात आली. मराठवाड्यात जेव्हा जेव्हा एखादा पक्ष राजकारण करू पाहतो त्यावेळेस तेलंगणाची सीमा लक्षात घेऊन तेथील उदाहरणे मराठवाड्यातील जनतेला दिली जातात. मराठवाड्यातील अनेक आंदोलनाला तेलंगणाची किनार असते. तेलंगणा येथून काही छुपे हात मराठवाड्यात आंदोलनासाठी लागलेले असतात.

अनेकदा तेलंगणातून रसद पुरवठा केल्यावर मराठवाड्यात आंदोलने होतात, असे दबक्या आवाजात बोलले जाते. यापूर्वीही तेलंगणातील माजी मुख्यमंत्री के. सी. आर यांनी मराठवाड्यात स्वतःचा पक्ष स्थापन केला होता; परंतु नंतर त्यांच्या पक्षाची हवाच निघून गेली. मुळात नांदेडचे असलेले; परंतु तेलंगणात स्थायिक झालेल्या काही मोठ्या व्यापाऱ्यांनी नांदेडला आंदोलनासाठी रसद पुरवठा केल्याचे सांगितले जात आहे. स्वतः आर्थिकदृष्ट्या भक्कम असल्याने केवळ एखाद्या पक्षाला उचकावून देण्याचे काम करण्यासाठी तसेच काही राजकीय पुढारी जवळ आहेत हे दाखविण्यासाठी व्यापारी मंडळींनी स्वतःचे हात मोकळे सोडले आहेत.

महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती निवडणुकीत आपली सत्ता यावी या उद्देशातून अनेक राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. या निवडणुकीत आपली शक्ती दाखविण्याच्या उद्देशाने अनेक लहान-मोठे पक्ष कामाला लागले आहेत. लोकांना कशा पद्धतीने जमवायचे जेणेकरून आपल्या मागे मोठा मॉब आहे हे दाखविण्यासाठी शेतकरी, विद्यार्थी तसेच जातीपातीचे राजकारण समोर केले जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार या तिघांनी आपापल्या पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांना निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी कामाला लागा असा संदेश दिलेला आहे.

किंबहुना मराठवाड्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे दौरे वाढले आहेत. त्यांच्या दौऱ्यात अनेकजण अजित पवार गटात प्रवेश करीत आहेत. काँग्रेसमध्ये असलेले अनेकजण पक्ष सोडून त्यांच्या मागे जात आहेत, तर राष्ट्रवादीच्या काहींनी काँग्रेसमध्ये प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत प्रवेश केला आहे. नांदेड जिल्ह्यात झालेले हे दोन्हीही नेत्यांचे पक्षप्रवेश सोहळे केवळ सत्तेतील अदलाबदलीसाठी झाल्याचे सांगितले जाते. येत्या महिन्याभरात मराठवाड्यात बऱ्याच उलथापालथी दिसून येतील. सत्ता मिळविण्यासाठी अनेकजण या पक्षातून त्या पक्षात उड्या मारत आहेत. पक्षप्रवेश सोहळे, आंदोलन व शक्तिप्रदर्शन या सर्वामागे स्वतःचे इप्सित साध्य करून घेणे हे एवढेच ध्येय काही पक्षांसमोर राहिले आहे, हे नाकारून चालणार नाही.

## मुरुमे टाळण्यासाठी 'हे' करा

### डॉक्टर टीप्स



'मुरुमं..' हा शब्द ऐकल्यावर अनेकांच्या कपाळावर आठ्या येतात. इंटरनेटवर 'ॲक्ने' अर्थात मुरमं, तारुण्यपिटिकांच्या समस्येबद्दलची खरीखोटी माहिती दिलेली असते. जुन्याजाणत्यांच्या अनुभवांपासून ते मैत्रीपूर्ण सल्ल्यांपर्यंत, केमिस्टकडे मिळणाऱ्या औषधांपेक्षा परिणामकारक असल्याचा दावा करणाऱ्या घरगुती उपचारांपासून ते नैसर्गिक उपचारांपर्यंत साऱ्यांचा भडिमार होताना दिसतो. त्यामुळे आपल्या 'मुरुमां'वरील उपचारांना सुरुवात करण्यापूर्वी या समस्येशी जोडलेल्या गैरसमजांपासून स्वत:ला दूर नेणे आवश्यक आहे.

'मुरुमां'शी संबंधित काही सर्वसाधारण मिथके आणि या गोष्टी कपोलकल्पित का आहेत, यामागची कारणे पुढीलप्रमाणे -

मिथक : चेहरा जास्त वेळा धुतल्याने 'मुरुमां'चे शुद्धीकरण होते वास्तव: मुरुमं ही धुळीमुळे उद्भवत नाहीत. त्वचेवरील छिद्रे धूळ बसल्याने बाहेरून बंद होतात, त्यामुळे मुरुमे उद्भवतात.**(क्रमशः)**....

## विनोद





गुरूजी : सांग असत्यवादी मोठा की सत्यवादी?
शिष्य : असत्यवादी.
गुरूजी : काहीतरी भलतंच कसं काय?
शिष्य : सत्यवादी चार अक्षरी शब्द आहे. असत्यवादी एका अक्षराने मोठा आहे.

## संदेश

Babu apni girlfriend se- darling kal ghar par aa jana koi bhi nahi hoga!
Jab ladki ghar par aati hai to sachmuch koi nahi tha.
Ladka- kya me tumhara hath tham lu?
Ladki – No thanks ! ye itna bhari nahi he!!

## सुविचार



जागृतावस्थेतील व्याधींना निद्रा हेच एकमेव औषध.


-सर्वेंटिस

**संस्कृत सुभाषित**

**जीवन्तोऽपि मृता: पञ्च व्यासेन परिकीर्तिता: । दरिद्रो, व्याधितो, मूर्ख:, प्रवासी नित्यसेवक: ।।**

अर्थ : दरिद्री, रोगी, मूर्ख, प्रवासी आणि वेठबिगार कामगार हे पाचजण जिवंत असून मेल्यासारखे आहेत अशी व्यासोक्ती आहे.

# मनोरंजक महाशब्दकोडे



**आडवे शब्द**

१. रावसाहेब रामराव – अर्थात गृहमंत्री आबांचे नाव
६. पोलिसांवरील अधिकारी
९. ही धरून लगडी घालतात
११. छिद्र, जखम
१२. जय पराजय
१४. घोंगड्या विणणारी जमात
१६. मोठा हातोडा
१७. रम्य दृश्य
१९. धमनी
२१. मला
२४. उपहास
२५. शरीर
२७. खरकट्याचा ढीग
२९. श्रीकृष्णाचे एक नाव
३१. वचक, भीती
३२. हिंदीत शरीर
३३. बारीक झिणझिण
३५. वाक्बगार
३७. अभिमन्यूला ठार मारणारा
३९. फायदा
४०. दहा अब्ज ही संख्या
४१. लाज
४३. रसाळ
४५. मूळ अर्थ शहाणा, सुंदर आणि प्रचलित अर्थ शहरी
४६. जाणे-येणे, वहिवाट
४८. पायताण
४९. सीतेची जुळी मुले
५१. खदक
४३. म--- रे झूठ मत बोलो, खुदा के पास जान हैफ
५४. पौराणिक आयुध
५५. ओझी उचलणारा
५७. सत्त्व
५९. जोखीम
६१. वाई-महाबळेश्वरमधील प्रसिद्ध घाट
६२. पोहणे
६४. गवताचे रुंद पान
६५. निवासस्थान
६६. मत देणारा
६८. उत्पन्नातील सरकारी हिस्सा
६९. भित्रा, पळ काढणारा
७०. कुलीन
७२. जाणकार
७५. पालव
७७. ढीग
७९. रक्तवाहिन्या
८०. जमीनदार
८१. कमीतकमी, निदान एवढे तरी!

**उभे शब्द**

१. संरक्षण
२. बाहेरच्या विरूद्ध
४. धरणातील पाणीसाठ्याचा प्रदेश
५. छोटी
६. सैनिक
७. जपणे
८. आवड
९. घट्ट, तणावाची स्थिती
१०. उष्ण
१३. प्रजा
१५. दृष्टीभेट
१६. गर्द, गच्च
१८. वेगाने
२०. शीतपेय
२२. सोनिया गांधी यांचे दिल्लीतील निवासस्थान या मार्गावर आहे
२३. खरे तर हे काही जेवण नव्हे!
२६. सापाला कधी धाकला म्हणू नये आणि याला आपला!
२८. माज
३०. आवाज, गोंगाट
३४. डोळ्यात तेल घालून करण्याचे काम
३५. विनाश
३६. राजालाही इथे नतमस्तक व्हावे लागते
३८. मृत्यूचा राजा
४१. संभवनीय
४२. पारशी जनतेचा वर्षारंभ दिन
४४. नूतन
४७. माळी, बागवान
५०. काढलेली खोडी
५२. जाडसर पीठ
५३. सर्व
५४. मारुती, भीम
५५. हिंदुस्थानी
५६. उपस्थित
५८. उत्सवाचे दिवस
६०. च्या बद्दल
६३. तरतूद
६४. साडी
६५. जात्याचा आवाज
६६. मधुमक्षिका
६७. शील, उदारता
६८. गव्हाचे बारीक पीठ
६९. पुन्हा
७१. नवरा
७३. नवरत्नांपैकी एक
७४. खेडे
७६. फितुरी
७७. भूपती
७८. माळ, हार

**आडवे उत्तर**

१.आर.आर. पाटील ६.फौजदार ९.तंगडी ११.क्षत १२.हारजीत १४.सनगर १६.घण १७.विलोभनीय १९.नस २१.मज २४.टर २५.तन २७.रमराट २९.दामोदर ३१.धाक ३२.बदन ३३.रवरव ३५.सराईत ३७.जयद्रथ ३९.लाभ ४०.खर्व ४१.शरम ४३.रसवान ४५.नागर ४६.राबता ४८.वहाण ४९.लवकुश ५१.चर ५३.सजन ५४.गदा ५५.भारवाहक ५७.कस ५९.जबाबदारी ६१.पसरणी ६२.जलतरण ६४.पात ६५.घर ६६.मतदार ६८.आयकर ६९.पळपुटा ७०.घरंदाज ७२.माहितगार ७५.पदर ७७.रास ७९.शीरा ८०.वतनदार ८१.गेला बाजार

**उभे उत्तर**

१.रक्षण ३.आत ४.पाणलोट ५.लहानी ६.फौजी ७.जतन ८.रस ९.तंग १०.गरम १३.रयत १५.नजरा-नजर १६.घनदाट १८.भरधाव २०.सरबत २२.जनपथ २३.उदरभरण २६.नवरा २८.मद ३०.रव ३४.रखवालदारी ३५.सर्वनाश ३६.ईश्वरचरणी ३८.यमराज ४१.शक्य ४२.नवरोज ४४.नव ४७.बनकर ५०.कुरापत ५२.रवा ५३.सकल ५४.गदाधर ५५.भारतीय ५६.हजर ५८.सणवार ६०.बाबत ६३.तजवीज ६४.पातळ ६५.घरघर ६६.मधमाशी ६७.दानत ६८.आटा ६९.परत ७१.दादला ७३.हिरा ७४.गाव ७६.दगा ७७.राजा ७८.सर




# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### गंभीर दुखापतीनंतर आयसीयु मधून भावनिक पोस्ट, चाहत्यांना दिलासा!



मुंबई -टीम इंडियाचा स्टार फलंदाज श्रेयस अय्यर सध्या एका गंभीर दुखापतीमुळे रुग्णालयात उपचार घेत आहे. चाहते तो लवकर बरा व्हावा यासाठी प्रार्थना करत असतानाच, श्रेयस अय्यरने स्वत: सोशल मीडियावर एक पोस्ट लिहून आपल्या प्रकृतीबद्दल मोठी माहिती दिली आहे. ही त्याची पहिलीच पोस्ट चाहत्यांसाठी मोठा दिलासा घेऊन आली आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध सिडनी येथे खेळल्या गेलेल्या तिसऱ्या वनडे दरम्यान त्याच्या पोटाला जोरदार बॉल लागला होता. या गंभीर दुखापतीमुळे त्याच्या प्लीहा मध्ये कट झाला आणि अंतर्गत रक्तस्राव सुरू झाला.
प्रकृती बिघडल्यामुळे त्याला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले आणि उपचारासाठी आयसीयूमध्ये हलवण्यात आले होते. या गंभीर घटनेनंतर श्रेयसने पहिल्यांदाच चाहत्यांसाठी भावनिक पोस्ट लिहली असून, तो लवकरच क्रिकेटच्या मैदानावर परतण्याची आशा त्याच्या चाहत्यांना मिळाली आहे.गंभीर दुखापतीमुळे आयसीयूमध्ये दाखल असलेला टीम इंडियाचा स्टार फलंदाज श्रेयस अय्यर याने सोशल मीडियावर पोस्ट लिहून महत्त्वाची माहिती दिली आहे

***

### 'सर्वात दुर्दैवी खेळाडू' शुभमन गिल मुळे सॅमसनवर होतोय अन्याय



मुंबई-टीम इंडिया सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर आहे आणि बुधवारी पहिला सामना खेळला गेला, जो पावसामुळे अर्ध्यातच रद्द करण्यात आला. भारताचे माजी क्रिकेटपटू क्रिस श्रीकांत यांनी संजू सॅमसनचा जोरदार बचाव केला आहे आणि म्हटले आहे की, टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये अव्वल क्रमांकावर फलंदाजी करतानाही त्याच्यावर अन्याय करण्यात आला आहे.भारताच्या माजी सलामीवीराने सुनावले खडेबोलअनेकदा शांत असलेल्या आणि शब्दांची उधळपट्टी न करणाऱ्या भारताचा माजी सलामीवीर क्रिस श्रीकांतने सॅमसनच्या फलंदाजीच्या स्थानात सतत होणाऱ्या बदलांबद्दल निराशा व्यक्त केली, ज्यामुळे केरळच्या या क्रिकेटपटूची लय आणि आत्मविश्वास बिघडला आहे असे त्याचे मत आहे. क्रिस श्रीकांतने त्याच्या युट्युब चॅनेलवर याबाबत वक्तव्य केलं आहे. ज्यात त्यांनी त्यांचं स्पष्ट मत व्यक्त केलं आहे.कोण आहे क्रिस श्रीकांत भारताचे महान फलंदाज सुनिल गावस्कर यांचे ते सलामीचे जोडीदार होते. गावस्कर यांचा संयम आणि श्रीकांत यांची आक्रमकता अशी भारताची जोडी होती. १९८३ च्या वर्ल्डकप फायलनमध्ये त्यांनी भारताकडून सर्वाधिक धावा केल्या.

***

### महिला संघ सेमीफायनलमध्ये हातावर काळी पट्टी बांधून का उतरले?

मुंबई-महिला विश्वचषक २०२५ चा दुसरा उपांत्य सामना आज ३० ऑक्टोबरला भारत आणि ऑस्ट्रेलिया संघांमध्ये खेळवला जात आहे. हा सामना नवी मुंबईतील डी वाय पाटील स्टेडियमवर होत आहे. ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला, तर भारतीय संघ गोलंदाजीने सामन्याला सुरूवात करेल. दरम्यान दोन्ही संघांचे खेळाडू हातावर काळी पट्टी बांधून मैदानावर उतरले आहेत, पण यामागचं नेमकं कारण काय आहे?भारत आणि ऑस्ट्रेलिया महिला संघाने सेमीफायनलसाठी संघात मोठे बदल केले आहेत. ऑस्ट्रेलियाच्या ताफ्यात कर्णधार एलिसा हिली परतली आहे. तर जॉर्जिया वेयरहमच्या जागी सॉफी मॉलिन्यू खेळताना दिसणार आहे. तर भारतीय संघात शफाली वर्मा, क्रांती गौड व रिचा घोष परतल्या आहेत. उमा छेत्री व हरलीन देओल यांना संघाबाहेर जावं लागेल आहे.राष्ट्रगीतादरम्यान दोन्ही संघांचे सर्व खेळाडू व पंचही हातावर काळी पट्टी बांधून मैदानावर उतरलेले दिसले. पण यामागचं कारणही तितकंच धक्का देणारं आहे. ऑस्ट्रेलियातील मेलबर्न येथे २९ ऑक्टोबरला एका १७ वर्षीय स्थानिक क्रिकेटपटूला जीवघेणी दुखापत झाल्याची माहिती समोर आली होती.

# भारतीय संघ दिमाखात फायनलमध्ये

**भारताचा ऐतिहासिक विजय ● ऑस्ट्रेलियाला केले चारीमुंड्या चीत ● आता द. आफ्रिकेशी होणार लढत**







**जेमिमा रॉड्रिग्सने एक महत्व-पूर्ण अशी नाबाद १२७**

नवी मुंबई: भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील महिला वनडे वर्ल्डकपच्या सेमीफायनल सामन्यात भारताने बलाढ्य ऑस्ट्रेलियावर मात करत फायनल गाठली आहे. आता फायनलमध्ये त्यांचा मुकाबला दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे. भारताला या सामन्यात विजयासाठी ३३९ धावांचे आव्हान मिळाले होते. भारताने ऑस्ट्रेलियाचे हे आव्हान ५ विकेट राखत पूर्ण केले.

भारतीय महिला संघाच्या जेमिमा रॉड्रिग्जने ठोकलेल्या शानदार शतकी खेळाच्या जोरावर भारताने ऑस्ट्रेलियाचे आव्हान पार केले आणि दिमाखात फायनलमध्ये प्रवेश केला. जेमिमाने या सामन्यात १२७ धावांची खेळी केली. तिच्या या खेळीमुळे भारताला हा विजय साकारता आला. त्याआधी स्मृती मंधाना, हरमनप्रीत कौर यांनीही चांगल्या खेळी केल्या.
३९ धावांच्या आव्हानाला प्रत्युत्तर देताना भारताची सुरूवात चांगली झाली नाही. शेफाली वर्मा केवळ १० धावा करून बाद झाली. यानंतर १०व्या षटकांत स्मृती मंधाना बाद झाली. तिने २४ धावा केल्या.
दरम्यान, यानंतर हरमनप्रीत आणि जेमिमा यांच्यात चांगली भागीदारी झाली. दोघांनी १८व्या षटकांत भारताची धावसंख्या १०० पार पोहाचवली. दोघांमध्ये शतकी भागीदारी झाली. मात्र ३६व्या षटकांत भारताला तिसरा झटका बसला तो हरमनप्रीतच्या रूपात. ती ८९ धावा करून परतली. यानंतर दीप्ती शर्माने चांगली खेळी केली. मात्र ४१व्या षटकांत ती २४ धावा करून बाद झाली. मात्र दुसरीकडे जेमिमा खेळतच होती. तिने ११५ चेंडूत शतक ठोकले. यानंतर ४६व्या षटकांत ऋचा बाद झाली. ती १६ बॉलमध्ये २६ धावा करून गेली. त्यानंतर हा विजय भारताच्या हातात होता.
ऑस्ट्रेलियाची फलंदाजी
ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि भारतासमोर ३३९ धावांचे विशाल लक्ष्य ठेवले. फीबी लिचफिल्ड आणि एलिसा हिली यांनी उत्कृष्ट फलंदाजी करत ऑस्ट्रेलियाला मोठ्या धावसंख्येकडे नेले. लिचफिल्डने तुफानी फलंदाजी करत ११९ धावा केल्या. एलिस पेरी (७७ धावा) आणि श्ले गार्डनर (६३ धावा) यांनीही मोठी भूमिका बजावली. भारताकडून श्री चरणी आणि दीप्ती शर्मा यांनी प्रत्येकी २ बळी घेतले

## एक चेंडू, आणि सर्व संपलंय भारत-ऑस्ट्रेलिया मॅचआधी १७ वर्षीय क्रिकेटपटूचा मृत्यू

नवी दिल्ली-सध्या भारतीय संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर असून पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना पावसामुळे रद्द झाला होता. दुसरा सामना मेलबर्नमध्ये होणार आहे, पण त्याआधीच या दु:खद घटनेची बातमी समोर आली. ऑस्ट्रेलियातील मेलबर्न शहरात १७ वर्षीय तरुण क्रिकेटपटू बेन ऑस्टिन याचा सरावादरम्यान चेंडू लागल्याने मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण क्रिकेट विश्व हादरलं असून, क्रिकेट ऑस्ट्रेलियानेही अधिकृत निवेदन जारी करून दु:ख व्यक्त केले आहे.
बेन ऑस्टिनसोबत नेमकं काय घडलं?
ही घटना मेलबर्नच्या पूर्व भागात घडली. बेन ऑस्टिन नेट प्रॅक्टिसदरम्यान फलंदाजी करत असताना चेंडू थेट त्याच्या डोक्यावर जाऊन लागला. ज्यामुळे त्याला तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले, पण दोन दिवसांनंतर म्हणजे ३० ऑक्टोबर रोजी गुरुवार त्याचा मृत्यू झाला. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने मएक्सफ वर पोस्ट करत लिहिले आहे की, मफ१७ वर्षीय मेलबर्न क्रिकेटर बेन ऑस्टिनच्या निधनाने आम्ही स्तब्ध आहोत. नेट्समध्ये सराव करताना झालेल्या या अपघाताने संपूर्ण क्रिकेट विश्व हादरलं आहे.फ्फ तर क्रिकेट व्हिक्टोरियानेही शोक व्यक्त करत म्हटले आहे की, मफआमच्या संवेदना ऑस्टिन कुटुंबीयांसोबत, त्याच्या सहकाऱ्यांसोबत आणि फर्नट्री गली क्रिकेट क्लब तसेच व्हिक्टोरियन क्रिकेट समुदायासोबत आहेत.बेन ऑस्टिन हा फर्नट्री गली क्रिकेट क्लब आणि एल्डन पार्क यांच्यातील स्थानिक टी-२० सामन्यापूर्वी नेट्समध्ये वॉर्म-अप करत होता. सरावादरम्यान चेंडू डोक्यावर लागल्याने तो गंभीर जखमी झाला. सहकाऱ्यांनी तात्काळ मदत केली. प्राथमिक उपचारानंतर बेन ऑस्टिनला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले, जिथे त्याला लाइफ सपोर्ट सिस्टमवर ठेवण्यात आले होते. त्याची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याचे सांगण्यात आले. रिंगवुड अँड डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष मायकेल फिन यांनी त्यांच्या कुटुंबाला सर्वतोपरी मदत देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र सर्व प्रयत्नांनंतरही बेन ऑस्टिनला वाचवता आले नाही. क्रिकेट जगताला हादरवणारी ही घटना पुन्हा एकदा क्रिकेटमधील सुरक्षिततेच्या मुद्द्यांवर गंभीर प्रश्न उपस्थित करते.बेनच्या निधनाने संपूर्ण क्रिकेटविश्वाला पुन्हा एकदा २०१४ मधील फिलिप ह्यूजच्या दु:खद मृत्यूची आठवण करून दिली. २०१४ मध्ये शेफिल्ड शिल्डच्या सामन्यात खेळताना ह्यूजच्या मानेला चेंडू लागला होता आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला होता. त्या घटनेनंतर क्रिकेट ऑस्ट्रेलियाने सुरक्षेचे आणि कंकशन प्रोटोकॉल्स अधिक कठोर केले होते. मात्र, ऑस्टिनच्या या घटनेमुळे पुन्हा एकदा खेळाच्या मैदानावरील सुरक्षेच्या निकषांवर


## रोहित शर्मा केकेआर कडून खेळणार? ट्रेडच्या चर्चावर मुंबई इंडियन्सची पहिली रिएक्शन!



मुंबई-ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर धमाकेदार कामगिरी करून रोहित शर्मा मुंबईमध्ये परत आला आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यातल्या ३ वनडे मॅचपैकी दोन सामन्यांमध्ये रोहितने अर्धशतक आणि शतक झळकावलं. आता पुढच्या महिन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वनडे सीरिजसाठी रोहित पुन्हा एकदा मैदानात दिसेल.
पण दुसरीकडे रोहित शर्मा मुंबई इंडियन्सची साथ सोडणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत.
रोहित शर्मासाठी मुंबई आणि केकेआर यांच्यात ट्रेड होईल, असंही बोललं जात आहे. याला कारण ठरत आहे रोहित शर्माचा खास मित्र अभिषेक नायर.
अभिषेक नायर याची केकेआरचा मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अभिषेक नायर केकेआरचा प्रशिक्षक झाल्यामुळे आता तो रोहितलाही केकेआरच्या टीममध्ये घेऊन येईल, असं बोललं जात आहे. आयपीएल २०२६ साठीचा लिलाव १५ डिसेंबरच्या आसपास होण्याची शक्यता आहे, त्यासाठी १५ नोव्हेंबरपर्यंत सर्व फ्रॅन्चायजींना रिटेन केलेल्या खेळाडूंची यादी जाहीर करावी लागणार आहे, असं वृत्तही समोर आलं आहे.
रोहित शर्मा केकेआरकडून खेळणार असल्याच्या चर्चा सुरू असतानाच मुंबई इंडियन्सने यावर स्पष्टीकरण दिलं आहे. मुंबई इंडियन्सने सोशल मीडियावर एक पोस्ट केली आहे. 'सूर्य उद्या पुन्हा उगवेल, हे निश्चित आहे. पण (नाईट) कडे, हे कठीण नाही, तर अशक्य आहे', असं कॅप्शन मुंबई इंडियन्सने रोहित शर्माच्या फोटोला दिलं आहे. या पोस्टसोबतच मुंबई इंडियन्सने रोहित शर्माबद्दल सुरू असलेल्या सर्व चर्चा फेटाळून लावल्या आहेत.
रोहित शर्माच्या नेतृत्वात भारताने मागच्या वर्षी टी-२० वर्ल्ड कपमध्ये विजय मिळवला, त्यानंतर रोहितने आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. तर यावर्षी इंग्लंड दौऱ्याच्या आधी रोहितने टेस्ट क्रिकेटलाही अलविदा केलं. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या वनडे सीरिजआधी रोहितला वनडे टीमच्या कॅप्टन्सीवरून काढण्यात आलं, त्यामुळेही मोठा वाद निर्माण झाला होता. रोहित शर्मा २०२७ चा वर्ल्ड कप खेळणार का? याबाबत प्रशिक्षक गौतम गंभीर आणि निवड समिती प्रमुख अजित आगरकर यांनी थेट उत्तर देणे टाळले.

# महिला एकदिवशीय सामन्यामध्ये सर्वात मोठे लक्षाचा पाठलाग करत मोठा विजय





भारताच्या महिला क्रिकेट संघाने आयसीसी महिला विश्वचषक २०२५ च्या उपांत्य फेरीच्या सामन्यात गतविजेत्या ऑस्ट्रेलियाला पराभूत केले आहे.: भारताच्या महिला क्रिकेट संघाने ऐतिहासिक कामगिरी करत आयसीसी महिला विश्वचषक २०२५ च्या उपांत्य फेरीच्या सामन्यात गतविजेत्या ऑस्ट्रेलियाला पराभूत केले आहे. दिग्गज ऑस्ट्रेलियाच्या संघाला हरवण्यासाठी ३३९ धावांचे मोठे लक्ष्य यशस्वीरित्या गाठत भारतीय संघान गुरुवारी नवी मुंबईत एक अविस्मरणीय वियय नोंदवला. याबरोबरच भारतीय संघाने स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. भारताने तिसऱ्यांदा विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे. जेमिमाह रॉड्रिग्सने केलेल्या दमदार शतकाच्या जोरावर भारताने गतविजेत्या ऑस्ट्रेलियाला स्पर्धेतून बाहेर केले. याबरोबरच कालच्या सामन्यात भारतीय संघाने अनेक रेकॉर्ड्स देखील मोडले आहेत. चला जाणून घेऊया:
महिला क्रिकेटमधील विक्रमी 'रन चेस'
१) भारतीय क्रिकेट संघाने काल ऐतिहासिक कामगिरी केली आहे. भारताने ऑस्ट्रेलियाविरुद्ध उपांत्य फेरीत ३३९ धावांचा पाठलाग यशस्वीरित्या पूर्ण करत ४८.३ षटकांत ५ गडी राखून विजय मिळवला. हा महिलांच्या एकदिवसीय क्रिकेटमधील आणि कोणत्याही महिला विश्वचषकातील आजवरचा सर्वात मोठा यशस्वी पाठलाग ठरला आहे.२) इतकच नाही तर हा आजवरच्या कोणत्याही विश्वचषकाच्या नॉकआउट सामन्यात यशस्वीरित्या करण्यात आलेला हा सर्वाधिक धावसंख्येचा पाठलाग होता, ज्यामुळे भारताने आजवर केलेल्या लक्ष्याचा पाठलाग करत मिळवलेल्या विजयांच्या यादीत हा विजय पहिल्या स्थानावर आहे. याआधी हा पराक्रम कोणत्याही संघाला करता आलेला नाही. विशेष बाब म्हणजे, पुरुष आणि महिला दोन्ही वनडे विश्वचषकाच्या नॉकआउट सामन्यांमध्ये आजवर ३०० हून अधिक धावांचा पाठलाग यशस्वीरित्या करण्यात आल्याची ही पहिलीच वेळ होती.
महिला वनडे क्रिकेटच्या इतिहासातील यशस्वीरित्या गाठण्यात आलेल्या ३०० हून अधिक धावांच्या लक्ष्य
३३९ - भारत (महिला) विरूद्ध ऑस्ट्रेलिया (महिला) , मुंबई डीवायपी, २०२५ वर्ल्डकप
३३१ - ऑस्ट्रेलिया (महिला) विरुद्ध भारत (महिला), विशाखापट्टनम, २०२५ वर्ल्डकप३०२ - श्रीलंका (महिला) विरूद्ध दक्षिण आफ्रिका, झेंीलहशर्षीिी, २०२४
जेमिमा रॉड्रिग्सने एक महत्त्वपूर्ण अशी नाबाद १२७ धावांची खेळी केली ज्यामुळे भारताला ही कामगिरी करणे शक्य झाले. हा विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत कोणत्याही भारतीय खेळाडूने केलेला सर्वाधिक स्कोअर आहे.
३) तसेच सेमी-फायनलमध्ये शतक ठोकल्याने जेमिमा ही ऑस्ट्रेलियाविरुद्ध नॉकआउट सामन्यात शतक झळकावणारी पहिली भारतीय महिला क्रिकेटपटू ठरली आहे. तसेच विश्वचषकाच्या नॉकआउट सामन्यात लक्ष्याचा पाठलाग करत असताना शतक झळकावणारी ती दुसरी फलंदाज ठरली आहे. यापूर्वी छरीं-डलळींशी ईीपींने २०२२ च्या अंतिम सामन्यात नाबाद १४८ धावांची खेळी केली होती.
हेही वाचा
भारतीय महिला संघाची विश्वविजेत्या ऑस्ट्रेलियाला पराभूत करत अंतिम फेरीत धडक; वाचा सेमी-फायनलमध्ये मोडलेल्या विक्रमांची यादी
जेमिमा आणि हरमनप्रीत यांची विक्रमी भागिदारी
४) या सामन्यात जेमिमा रॉड्रिग्स आणि हरमनप्रीत कौर यांच्यात झालेली १६७ धावांची भागीदारी ही आतापर्यंतच्या महिला विश्वचषकाच्या नॉकआउट सामन्यांमध्ये कोणत्याही भारतीय जोडीने केलेली सर्वात मोठी भागीदारी ठरली आहे.
तर दुसरीकडे ऑस्ट्रेलियाने रचलेला ३३८ धावांचा डोंगर हा ऑस्ट्रेलियाचा महिला विश्वचषक उपांत्य फेरीतील सर्वात मोठा स्कोअर बनला आहे. ज्यामध्ये झहेशलश डळींलहषळशश्रव चे ११९ धावांचे तर एश्रश्रीश झर्शीी चे ७७ धावांचे योगदान होते. तसेच या सामन्यात दोन्ही संघानी ६७९ धावा काढल्या हा महिला वनडे विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वाधिक एकूण धावसंख्येचा (ींरश्र रससीशसरींश) विक्रम आहे.
कमी वयात मोठं यश
ऑस्ट्रेलियन सलामीवीर झहेशलश डळींलहषळशश्रव ने विश्वचषकाच्या नॉकआउट सामन्यात शतक झळकावणारी सर्वात कमी वयाची खेळाडू म्हणून विक्रम नोंदवला आहे, तिचे वय २२ वर्षे आणि १९५ दिवस इतके आहे. तिने दक्षिण आफ्रिकेच्या डरीीर थेश्रींररीवीं ला फक्त एका दिवसाने मागे टाकले आहे. तसेच डळींलहषळशश्रवने केलेली ११९ ही धावसंख्या नॉकआउट सामन्यात केलेली सर्वोत्तम वैयक्तिक धावसंख्या ठरली आहे.
विश्वचषकाचा अंतिम सामना भारत विरूद्ध दक्षिण आफ्रिका
भारतीय महिला क्रिकेट संघ एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात रविवारी (२ नोव्हेंबर) दक्षिण आफ्रिकेशी दोन हात करणार आहे. हा सामना नवी मुंबई येथील डीवाय पाटील स्पोर्ट्स अकादमी येथे होणार आहे.

# औसा - तुळजापूर महामार्गावरील नूतन रोनक सीएनजी स्टेशनचे थाटात उदघाटन

**लातूर/प्रतिनिधी** : औसा - तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील औसा शहरापासून तीन किमी अंतरावर असणाऱ्या वानवडा फाटा येथील नूतन रोनक सीएनजी स्टेशन या नूतन पंपाचे उदघाटन गुरुवारी पंढरपूरच्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर ट्रस्टचे सहअध्यक्ष हभप. गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते थाटात पार पडले.

याप्रसंगी महानगर गॅसचे मुख्य कार्यकारी अधिकारी यज्ञेश धुरी, विष्णुदासजी अग्रवाल, दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, लातूर धाराशिव महानगर गॅसचे जी.ए. मुख्य व्यवस्थापक महेश बिलगुडी, प्रोजेक्ट मॅनेजर समीर संकपाळ, अभिनव मानव विकास संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सीए संजय अग्रवाल आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आपल्या आशीर्वचनपर मनोगतात हभप. गहिनीनाथ महाराज यांनी रोनक अग्रवाल यांच्या या नूतन उपक्रमाचे कौतुक केले. काळाची गरज ओळखून त्यांनी सीएनजी पंपाची उभारणी केल्याचे त्यांनी नमूद केले. आजोबांनी , वडील - काकांनी केलेल्या दैदिप्यमान कार्याचा वारसा पुढे चालविण्याची जबाबदारी युवा पिढीचा प्रतिनिधी म्हणून रोनककडे आली आहे. समाजाकडून आपल्याला जे मिळाले आहे, त्यातून सर्वांच्या आशिर्वादाने हा व्यवसाय यशस्वीपणे चालेल असा विश्वासही गहिनीनाथ महाराजांनी व्यक्त केला.



यज्ञेश धुरी यांनी यावेळी बोलताना सीएनजी पर्यावरणपूरक गॅसचे महत्व विशद केले. सीएनजी गॅस ची संपूर्ण माहिती दिली तसेच लातूर विभागातील हे ४१ वे सीएनजी स्टेशन असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे रोनक सीएनजी स्टेशन लवकरात लवकर ऑनलाईन करण्यात येणार असल्याची घोषणा केली.

लक्ष्मीरमण लाहोटी, डॉ. चेतन सारडा, सीए संजय अग्रवाल, महेश बिलीगुडी,कमलकिशोर अग्रवाल यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. नरेंद्र अग्रवाल, कमलकिशोर अग्रवाल , रोनक अग्रवाल व अग्रवाल परिवारातील सदस्यांनी कार्यक्रमास उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोनक अग्रवाल यांनी केले. प्रास्तविकात त्यांनी या सीएनजी स्टेशनच्या उभारणीसाठी सहकार्य केलेल्या सर्वांचे ऋण व्यक्त केले. ग्राहकांच्या सेवेत आजपासून आपल्या सीएनजी पंपावर उत्कृष्ट सेवा देण्याची हमी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चक्षुपाल कांबळे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. माधुरी अग्रवाल यांनी केले. याप्रसंगी आदिनाथ सांगवे, दिलीप माने, पी.के. पाटील, जयेश बजाज, ॲड. श्रीकांत उटगे, रमाकांत स्वामी, गिरीश कुलकर्णी, व्यंकटेश पुरी, डॉ. हरिप्रसाद सोमाणी, डॉ. संजय शिवपूजे, डॉ. ओमप्रकाश भोसले, व्यंकट गर्जे, विवेक रेड्डी, हुकूमचंद कलंत्री, नरेश पाटील चाकूरकर, प्रा. रामेश्वर बद्दर , सुनील माने यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एसटी डेपो नांदेड आगार येथे दक्षता जनजागृती सप्ताहाला सुरुवात, कामगार कर्मचाऱ्यांनी घेतली भ्रष्टाचार विरोधी शपथ



**नांदेड/प्रतिनिधी** : केंद्रीय दक्षता आयोगाने निर्देशीत केल्यानुसार राज्य शासनाच्या परिपत्रकान्वये संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये दक्षता जनजागृती सप्ताहाला दि.२७ ऑक्टोबर २०२५ ते दि.२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीमध्ये दक्षता आपली सामाजिक जबाबदारी या घोषवाक्याने दक्षता जनजागृतीला सुरूवात झाली असून याचाच एक भाग म्हणून आज दि.२८ ऑक्टोबर २०२५ मंगळवार रोजी सकाळी ठिक ११ वाजता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे आगाराचे सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक मा.श्री. विष्णू हारकळ यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम घेवून या सप्ताहाला सुरूवात झाली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा.श्री. गुणवंत एच.मिसलवाड यांनी केले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, भ्रष्टाचार हा देशातील, जगातील कोणत्याही देशाच्या प्रगतीत अडथळा असतो. सामान्य जनतेचा विश्वास ढळतो, विकासाची गती थांबते, म्हणून आपण सर्वांनीच सजग राहून भ्रष्टाचाराला आळा घालणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन केले. प्रास्ताविकपर भाषणात प्रमुख वक्ते म्हणून बोलताना ते पुढे म्हणाले की, तुम्ही-आम्ही आपण सर्वांनीच लाच देणार नाही व लाच घेणार नाही आणि लाच घेवू देणार नाही, अशी भ्रष्टाचार विरोधी भूमीका घेवून विकसीत आपल्या भारत देशाच्या निर्मितीत मोलाचे योगदान द्यावेत, असेही ते शेवटी म्हणाले.

यावेळी मा.श्री.गुणवंत एच.मिसलवाड यांनी एसटी आगारातील सर्व कष्टकरी कामगार-कर्मचाऱ्यांना भ्रष्टाचार विरोधाची सामुहिकरित्या शपथ दिली. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून बसस्थानक प्रमुख मा.श्री.यासीन हामीद खान, सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक विष्णू हारकळ, वाहतुक निरीक्षक सुधाकरराव घुमे, पाळी प्रमुख मनोहर माळगे, विनायक चव्हाण, वाहतुक नियंत्रक उमेश सातोनकर, सुरेश फुलारी, सौ.जयश्री झुंजारे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी रापम आगारातील कामगार-कर्मचारी बंधू-भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

## मुक्त विद्यापीठ योग शिक्षणक्रम विद्यार्थिनी पुण्याच्या कु. मयुरी शेलारचा 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये विक्रम




**नाशिक/प्रतिनिधी** : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या योग शिक्षणक्रमाची विद्यार्थिनी कु. मयुरी विजय शेलार हिने 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' मध्ये आपले नाव नोंदवले आहे. तिने केवळ ३० सेकंदात ४७ 'चक्रासन पुश-अप्स' करण्याचा विक्रम करून दाखवला आहे.

कु. मयुरी मुक्त विद्यापीठाच्या पुणे येथील न्यू एज्युकेशन सोसायटी अभ्यास केंद्राची विद्यार्थिनी आहे. तिने याआधी मुक्त विद्यापीठाचा योगशिक्षक पदविका शिक्षणक्रम पूर्ण केला असून सध्या ती विद्यापीठाचाच एम.ए. योग (प्रथम वर्ष) शिक्षणक्रम शिकत आहे. कु. मयुरीने दिनांक २६ सप्टेंबर २०२५ रोजी हा पराक्रम केला. ज्यास नुकतीच इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड अचिव्हर म्हणून मान्यता मिळाली आहे. या विक्रमासाठी तिला न्यू एज्युकेशन सोसायटी अभ्यास केंद्रप्रमुख डॉ. गिरीश धडफळे, योगशिक्षिका श्रीमती सुवर्णा भापकर तसेच सानिका बाम यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'च्या प्रतिनिधी तथा रेकॉर्ड मॅनेजर मानसी सतेजा यांनी या विक्रमाची नोंद केली.

विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी महाले, प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, पुणे विभागीय केंद्र संचालक डॉ. व्ही. बी. गायकवाड व आरोग्य विज्ञान विद्याशाखा संचालिका डॉ. रश्मी रानडे यांनी या विक्रमाबद्दल कु. मयुरी शेलारचे अभिनंदन केले आहे.

आपल्या या यशाबद्दल बोलताना मयुरीने आनंद व्यक्त करत म्हटले की, ''मुक्त विद्यापीठातून योग डिप्लोमा आणि एम.ए. योग करत असताना मला खूप काही शिकायला मिळत आहे. अभ्यासकेंद्रातील शिक्षक व अधिकारी कर्मचारी यांचे उत्तम सहकार्य लाभले. मी याबद्दल सर्वांची आभारी आहे.''

## जीममध्ये व्यायाम करताना अस्वस्थ वाटू लागले; पुण्यात अग्निशमन दलातील जवानाचा अकाली मृत्यू

**पुणे/प्रतिनिधी** : अलिकडच्या काळात विविध आजार आणि तरुण वयातच हृदयविकाराच्या घटनांचं प्रमाण वाढत असल्याचं पाहायला मिळत आहे. कधी जीममध्ये व्यायाम करताना, तर कधी क्रिकेटच्या मैदानावरच खाली कोसळून मृत्यू झाल्याच्याही दुर्दैवी घटना गडल्या आहेत. आता, पिंपरी-चिंचवड शहरातील चोविसावाडी फायर स्टेशन येथे मंगळवारी सायंकाळी जिममध्ये व्यायाम करत असताना अग्निशमन दलाचे ३१ वर्षीय जवान राजेश रामभाऊ राऊत यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांचा अकाली निधनाने अनेकांना धक्का बसला असून परिसरात शोककळा पसरली आहे.

### आमदार अभिमन्यू पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश;

## लातूरच्या 'स्टॅच्यू ऑफ नॉलेज' प्रकल्पाला १० कोटीच्या निधीची प्रशासकीय मान्यता

**लातूर/प्रतिनिधी** : लातूरकरांसाठी अभिमानाची बातमी! शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे उभारण्यात येणाऱ्या विश्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७५ फुट उंचीच्या भव्य पुतळ्याच्या 'स्टॅच्यू ऑफ नॉलेज' या प्रस्तावित प्रकल्पाला अखेर १० कोटी रुपयांच्या मंजूर निधीसाठी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या महत्त्वपूर्ण कामासाठी आमदार अभिमन्यू पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असून, लातूरकरांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

या भव्य प्रकल्पासाठी राज्य शासनाने पूर्वीच १० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता, मात्र प्रशासकीय मान्यता न मिळाल्याने काम सुरू होऊ शकले नव्हते. या बाबत विविध सामाजिक संघटनेच्या शिष्टमंडळाने आमदार अभिमन्यू पवार यांना सविस्तर माहिती दिली. त्यानंतर आमदार पवार यांनी तात्काळ लातूरचे जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांच्याशी संपर्क साधून सदर कामाला प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याची विनंती केली होती.यानंतर आमदार अभिमन्यू पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन 'स्टॅच्यू ऑफ नॉलेज'च्या मंजूर कामाला प्रशासकीय मान्यता देण्याबाबत सविस्तर चर्चा केली. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर अखेर मंगळवार दि.२८ रोजी या १० कोटींच्या मंजूर कामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

या संदर्भात आमदार अभिमन्यू पवार म्हणाले की, ''मला सांगताना आनंद होत आहे की लातूरातील प्रस्तावित 'स्टॅच्यू ऑफ नॉलेज' प्रकल्पासाठी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या कार्यात सहकार्य करणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, तसेच लातूरचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि संपूर्ण जिल्हा प्रशासनाचे मनःपूर्वक आभार मानतो.''

आमदार पवार यांनी पुढे सांगितले की, ''स्टॅच्यू ऑफ नॉलेजच्या उर्वरित कामासाठी आणखी १२ कोटी रुपयांचा निधी आवश्यक असून, तो मिळवण्यासाठी माझा पाठपुरावा सुरू राहील.''या निर्णयामुळे लातूर शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे आणि ज्ञानाच्या अधिष्ठानाचे प्रतीक ठरणारा हा 'स्टॅच्यू ऑफ नॉलेज' लातूरचे नवे ओळखचिन्ह बनणार आहे. या पुतळ्यामुळे केवळ लातूरचे सांस्कृतिक व ऐतिहासिक महत्व वाढणार नाही, तर समाजात समानता, शिक्षण आणि प्रेरणेचा दीप म्हणून हा प्रकल्प उजळणार आहे.

## राज्यस्तरीय धनगर समाज वधु वर परिचय मेळावा

**लातूर/प्रतिनिधी** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सर्वांगिण विकास मंडळ कार्यकारिणीची बैठक नुकतीच पार पडली असुन प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी धनगर समाजाचा २० वा राज्यस्तरीय वधु - वर परिचय मेळावा रविवार, दि.२१ डिसेंबर, २०२५ रोजी सकाळी १०.०० वा. विष्णुदास मंगल कार्यालय, अहिल्यादेवी होळकर चौक, नवीन रेणापुर नाका, अंबाजोगाई रोड लातूर येथे संपन्न होणार आहे. तरी इच्छुक वधु - वर / पालकांनी वधु - वरांची माहिती (बायोडाटा) पासपोर्ट फोटोंसह प्रत्यक्ष किंवा पोस्ट, कुरिअर, ईमेल (mgmandurke@gmail.com) द्वारे बुधवार दि.१० डिसेंबर, २०२५ पर्यंत पाठवावी. व्हॉटस्अपद्वारे पाठवु नये. तसेच वधू वरांच्या नोंदी स्वीकारण्यासाठी लातूर शहरात १८ ठिकाणी व चाकूर, अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा, उमरगा, लोहारा, तुळजापूर, धाराशिव, अंबाजोगाई, बीड, गेवराई, परळी, परभणी, चापोली, हादगाव, नांदेड, जालना, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर व पुणे येथे व्यवस्था करण्यात आली आहे. सदरील वधु - वर नोंदणी निशुल्क / मोफत असुन या भव्य दिव्य वधू - वर परिचय मेळाव्यास सर्व समाज बांधवानी उपस्थित राहावे असे आवाहन मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९९६०६७५७७७, ९७६३७७९७२३ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.

## गायक प्रा. उमेश मोहिते आणि प्रा. सुनीता मोहिते यांचा एकाच महिन्यात तीन पुरस्कारांनी सन्मान

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर जिल्ह्याचा अभिमान असलेल्या गायक प्राध्यापक उमेश मोहिते आणि प्राध्यापक सुनीता मोहिते या सुप्रसिद्ध संगीत जोडीचा एकाच महिन्यात तीन प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरव करण्यात आला आहे. दिनांक २६ ऑक्टोबर २०२५ रोजी देवाची आळंदी, पुणे येथे आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र भूषण कला रत्न पुरस्कार २०२५ हा सन्मान संस्थेचे अध्यक्ष मदनजी रेंगडे पाटील आणि प्रसिद्ध अभिनेत्री प्रतीक्षा चव्हाण यांच्या हस्ते या दाम्पत्याला प्रदान करण्यात आला.

यापूर्वी, ५ ऑक्टोबर २०२५ रोजी त्यांना सरदार वल्लभभाई पटेल अवॉर्ड २०२५ ऑनलाईन पद्धतीने देण्यात आला, तर १२ ऑक्टोबर २०२५ रोजी भारत ह्युमन राईट फाऊंडेशन, पुणे यांच्या वतीने राजेश तरी आदर्श संगीत प्राध्यापक सेवा रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या तिन्ही सन्मानांमुळे मोहिते दाम्पत्याच्या कार्याचा गौरव महाराष्ट्रभर झाला आहे. त्यांनी यापूर्वीही सूरमणी पुरस्कार, कला श्री पुरस्कार, आदर्श गायक पुरस्कार अशा अनेक सन्मानांनी आपले नाव राज्यभर गाजवले आहे.

प्रा. उमेश अभिमन्यू मोहिते हे मूळचे चारोळी (ता. निलंगा, जि. लातूर) येथील असून सध्या विलासराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय, लातूर येथे संगीत विषयाचे अध्यापन करतात. तर प्रा. सुनीता मोहिते या गोविंदराव गीते कनिष्ठ महाविद्यालय, पानगाव येथे ज्युनिअर स्तरावर संगीत शिकवतात.

तसेच दोघेही 'स्वर साधना संगीत विद्यालय', खाडगाव रोड, लातूर येथे खासगी वर्गही घेतात. ग्रामीण भागातून



संगीताच्या विश्वात पाऊल ठेवून त्यांनी आपल्या मेहनतीच्या जोरावर राज्यस्तरावर मानाचं स्थान मिळवलं आहे. त्यांच्या या यशाचे लातूरसह संपूर्ण मराठवाड्यातून कौतुक होत आहे.


पार्श्व मेडिकल स्टोअर्स
आंबाजोगाई रोड, लातूर

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १. जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २. जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९


**महावितरण** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

### जाहीर निवेदन

महावितरण स्थापत्य विभागीय कार्यालय लातूर अंतर्गत सर्व ठेकेदार व खालील दिलेल्या विविध कारणास्तव जे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे लेनदार आहेत, अशा सर्वांना कळविण्यात येते की, या कार्यालयाकडे ३ वर्ष पूर्वीची रक्कम (०१) सुरक्षा ठेव (Security Deposit), राखून ठेवलेली (Retaintion) आणि बयाना रक्कम (EMD) हि निर्लेखित करावयाची आहेत. तरी स्थापत्य विभागीय कार्यालय लातूर अंतर्गत काम केलेले सर्व ठेकेदार व विविध कारणास्तव असलेले लेनदार यांनी त्याची दखल घ्यावी व आपल्याकडील मूळ जमा पावती तसेच उपलब्ध दस्तऐवजांसह रक्कम परतावा मिळविण्याकरिता अर्ज सादर करण्यात यावा. तसेच सदर यादी खाली दर्शवलेल्या अधिकारी यांचेकडे उपलब्ध आहे. तरी याबाबत हरकत असल्यास दि.१४.११.२०२५ पर्यंत कार्यकारी अभियंता (स्थापत्य) विभागीय कार्यालय लातूर येथे संपर्क साधावा व दि.१४.११.२०२५ नंतर सदरची रक्कम निर्लेखित केली जाईल. तसेच त्यानंतर कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही. तसेच स्थापत्य विभागीय कार्यालय यास जबाबदार राहणार नाही याची नोंद घेण्यात यावी. संपर्कः स्थापत्य विभागीय कार्यालय श्री. व्ही. आय. मिश्रा उप व्यवस्थापक (विवले.) मो. 9422178590

कार्यकारी अभियंता (स्था)
स्थापत्य विभाग म.रा.वि.वि. कंपनी मर्या, लातूर.

PROLTR No.128 Dt. 29.10.2025

# महाराष्ट्र अमृततर्फे दीपावलीत होणार विश्वविक्रमी दुर्गोत्सव

धाराशिव (जिमाका) महाराष्ट्राच्या प्रत्येक भूमीचा कण-कण छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याने पावन झाला आहे.महाराजांच्या पराक्रमाचे प्रतीक असलेले दुर्ग व गड हे महाराष्ट्राच्या अभिमानाचे द्योतक आहेत.दरवर्षी दीपावलीच्या सणात बालके मातीचे किल्ले साकारून शिवरायांच्या कार्याचे स्मरण करतात.याच भावनेला पुढे नेत,महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी म्हणजेच 'अमृत' संस्थेने या दीपावलीत विश्वविक्रमी दुर्गोत्सव साजरा करण्याचा संकल्प केला आहे.

शिवछत्रपतींच्या पराक्रमाचे साक्षीदार असलेल्या १२ दुर्गांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यात आले आहे.महाराष्ट्र शासनाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हे शक्य झाले असून,संपूर्ण महाराष्ट्राच्या अभिमानात भर पडली आहे.

दीपावलीच्या सुट्टीदरम्यान प्रत्येक घरात,अंगणात,बाल्कनीत किंवा सोसायटीच्या सार्वजनिक ठिकाणी या १२ दुर्गांपैकी कोणत्याही एका दुर्गाची प्रतिकृती तयार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.सहभागी नागरिकांनी आपल्या तयार केलेल्या दुर्गाची प्रतिकृतीसह सेल्फी काढून http://www.durgotsav.com या संकेतस्थळावर अपलोड करावा.

दुर्गोत्सवात सहभागी झालेल्या नागरिकांच्या छायाचित्रांचे संकलन करून या उपक्रमाला विश्वविक्रमाचा दर्जा मिळविण्यात येणार आहे.या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्वांना मुख्यमंत्री यांच्या स्वाक्षरीने अभिनंदन पत्र पाठविण्यात येईल.

'अमृत विद्या'द्वारे निःशुल्क प्रशिक्षण देण्यात येणार आहे.'अमृत' संस्थेने तयार केलेल्या 'अमृत विद्या' या डिजिटल लर्निंग प्लॅटफॉर्मवर छत्रपती शिवाजी महाराजांच्या गौरवशाली इतिहासावर आधारित ९९९ रुपये किंमतीचे प्रशिक्षण सर्व सहभागींना निःशुल्क उपलब्ध करून दिले जाणार आहे.

या प्रशिक्षणामध्ये - स्वराज्यरक्षक दुर्ग,शिवरायांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना,कवी भूषण यांची कवने,स्वराज्य योद्ध्यांच्या परिचयाची श्रृंखला.अशा विविध विषयांचा समावेश आहे.

या १२ दुर्गांपैकी एक साकार करा.
निवडण्यासाठी उपलब्ध -दुर्ग:
रायगड,राजगड,प्रतापगड,सिंधुदुर्ग,
साल्हेरदुर्ग,खांदेरीचा दुर्ग,जिंजी,
पन्हाळगड,शिवनेरी, विजयदुर्ग, लोहगड,
पद्मदुर्ग (सुंवर्णदुर्ग).

सेल्फी मार्गदर्शन : १२ दुर्गांपैकी कोणत्याही एका दुर्गाची प्रतिकृती साकारावी. सेल्फीत दुर्गाचा जास्तीत जास्त भाग दिसेल,याची काळजी घ्यावी.

'दुर्गोत्सव २०२५' या ऐतिहासिक कार्यक्रमाचे अनावरण शिवसृष्टी हिस्टोरिकल थीम पार्क,पुणे येथे अमृत संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक श्री.विजय जोशी यांच्या हस्ते पार पडले.या कार्यक्रमात अमृत संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी श्रीराम बेंडे, प्रवीण पांडे, सिद्धेश्वर वरणगावकर आणि राज्य व्यवस्थापक दीपक जोशी उपस्थित होते.

या प्रसंगी श्री. विजय जोशी म्हणाले, महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिक - लहान असो वा मोठा - दिवाळीत गडदुर्गाची प्रतिकृती बनवून,त्यासह सेल्फी घेऊन 'दुर्गोत्सव' संकेतस्थळावर अपलोड करावा.हीच आपल्या शिवरायांना खरी मानवंदना ठरेल.

# अवैध तंबाखु पानमसाला व सिगारेट विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)-नळदुर्ग पोलीस ठाणे अंतर्गत संतराम वय ६६ वर्षे, रा. अणदुर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२८.१०.२०२५ रोजी अणदुर येथे अंगणवाडी समोर महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला तत्सव पदार्थ केसरयुक्त विमल पान मसाला, व्ही वन तंबाखु एकुण २७० किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगलेला असताना नळदुर्ग पोलीसांना मिळून आला. तर विश्वनाथ वय ४८ वर्षे, रा.फुलवाडी ता. तुळजापूर जि.धाराशिव यांनी दि.२८.१०.२०२५ रोजी फुलवाडी येथे ग्रामपंचायत कार्यालय जवळ सार्वजनिक ठिकाणी महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला तत्सव पदार्थ केसरमिश्रीत प्रीमियम सुपर जेन पान मसाला, व्ही वन तंबाखु, एस. पी. ९९९ तंबाखु असे एकुण३९० किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगलेला असताना नळदुर्ग पोलीसांना मिळून आला. तर मुनाफ वय ६० वर्षे, रा. काटगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२८.१०.२०२५ रोजी काटगाव येथील बस स्थानक चौकात मुनाफ पान शॉप नावाच्या टपरीमध्ये महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला तत्सव पदार्थ केसरयुक्त विमल पान मसाला,गाय छाप तंबाखु, डायरेक्टर स्पेशल पान मसाला एकुण ५९५ किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगलेला असताना नळदुर्ग पोलीसांना मिळून आला. तर शिराज वय ४५ वर्षे, रा.काटगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२८.१०.२०२५ रोजी काटगाव येथील बस स्थानक चौकात मुनाफ पान शॉप नावाच्या टपरी मध्ये सार्वजनिक ठिकाणी महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला तत्सव पदार्थ गायछाप तंबाखुचे एकुण ५०५ किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगलेला असताना नळदुर्ग पोलीसांना मिळून आला. तर सुनिल वय ३० वर्षे, रा.अंबिका नगर काटगाव ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२८.१०.२०२५ रोजी १८.४५ वा. सु.काटगाव येथील अंबिका नगर येथे अंबकि पान शॉप नावाच्या टपरीमध्ये सार्वजनिक ठिकाणी महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला तत्सव पदार्थ, डायरेक्टर स्पेशल पान मसाला, केसरयुक्त विमल पान मसाला, गाय छाप तंबाखु एकुण ४७५ किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगलेला असताना नळदुर्ग पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द कलम- कलम ६ (ब),२४ सिगारेट व इतर तंबाखु उत्पादन जाहितरातीस प्रति व वाणिज्य पुरवठा विनीमय अधिनियम २००३ अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे स्वतंत्र ५ गुन्हे नोंदवले आहेत.

तुळजापूर पोलीस ठाणे अंतर्गत हनुमंत बाबुराव वय ३१ वर्षे, रा.सिंदफळ ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२९.१०.२०२५ रोजी १९.२० वा. सु.सिंदफळ शिवारातील आनंदवन बार न्उ हॉटेलचे बोर्डाचे जवळील पान शॉप मध्ये महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला तत्सव पदार्थ डायरेक्टर स्पेशल पान मसाला, विमल पान मसाला एकुण ६३२ किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगलेला असताना तुळजापूर पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द कलम- कलम ६ (अ),२४ सिगारेट व इतर तंबाखु उत्पादन जाहितरातीस प्रति व वाणिज्य पुरवठा विनीमय अधिनियम २००३ अन्वये तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## टीसी हरवली आहे

**कोमल हरिश्चंद्र राऊत या नावाची इयत्ता अकरावीची तेरणा महाविद्यालय धाराशिवची टीसी. एमआयडीसी रोड धाराशिव, गड पाटी ते शिंगोली प्रवासा दरम्यान हरवली आहे. कोणास सापडल्यास कळवावे योग्य बक्षिस दिले जाईल.**
**संपर्क: ९१७५३२५७०८**


लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708


# नोकरी महोत्सव आणि स्वयंरोजगार मेळाव्यास उस्फुर्त प्रतिसाद; आयोजक शंतनु पायाळ यांच्या कार्याचे आ. राणादादांनी केले कौतुक




धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- दिनांक २८ ऑक्टोबर २०२५ रोजी भव्य नोकरी महोत्सव आणि स्वयंरोजगार मेळावा पुष्पक मंगल कार्यालय, येथे संपन्न झाला. सदरील मेळाव्याचे उद्घाटन मित्रा संस्थेचे उपाध्यक्ष माननीय आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते झाले. पुष्पक मंगल कार्यालय, धाराशिव येथे भव्य नोकरी महोत्सव व स्वयंरोजगार मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या महोत्सवाचा शुभारंभ करून उपस्थितांशी संवाद साधला. या मेळाव्यास २२०० हून अधिक इच्छुक उमेदवारांची उपस्थिती होती. त्यापैकी ४७८ उमेदवारांना ऑफर लेटर मिळाले व ५०३ उमेदवारांना शॉर्टलिस्ट करून अंतिम मुलाखतीसाठी कंपनीत बोलवले आहे. तसेच ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवारांना येत्या वर्षभर त्यांच्या पात्रतेनुसार रोजगाराच्या संधीबाबत माहिती मिळणार आहे. या महोत्सवात ५२ हून अधिक नामांकित कंपन्यांनी ज्यात एच.सी.एल, टाटा प्रीव, बजाज ऑटो, एक्सीस बँक, ईत्यादी नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला व उपस्थित उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. या महोत्सवाचे आयोजन भाजपा चे युवा नेते मा.शंतनू पायाळ यांनी केले होते.

स्वतःचा व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी विविध शासकीय महामंडळांच्या योजनांची माहिती आणि मार्गदर्शन देखील या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आले होते.

जिल्ह्यातील अतिवृष्टी आणि पुराच्या अभूतपूर्व परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, तरुण-तरुणींच्या हाताला काम मिळावे, रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात या हेतूने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असे आयोजक शंतनू पायाळ यांनी सांगितले. येत्या काळातही अशा प्रकारचे नोकरी व स्वयंरोजगार महोत्सव आयोजित करण्यात येणार आहेत.

यावेळी माजी खा. श्री.सुधाकरराव शृंगारे, श्री.दत्ताभाऊ कुलकर्णी, श्री.नितीन काळे, श्री. शंतनू पायाळ, श्री. विकास बारकूल, श्री. खंडेराव चौरे, श्री.अमित शिंदे, श्री.सुनील काकडे, श्री. अभय इंगळे, श्री. राहुल काकडे, सौ. अस्मिताताई कांबळे, श्री. प्रीतीताई कदम, श्रीमती उषाताई येरकळ, कु. विद्या माने, श्री. नीलकंठ पाटील, श्री.संदीप इंगळे, श्री. सनी पवार, श्री. नितीन शेरखाने, श्री.सागर दंडनाईक, श्री. मदन बारकूल, श्री. कुणाल निंबाळकर, श्री. पुष्पकांत माळाले, श्री. गोपाळ कदम यांच्यासह तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, प्रा. चंद्रजीत जाधव यांच्यासह जिल्हाभरातून आलेले तरुण तरुणी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.


स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

**जिल्हादंडाधिकारी कार्यालय, धाराशिव** (उपचिटणीस शाखा)
मेन रोड, धाराशिव पिनकोड - ४१३५०१ दुरध्वनी क्र. ०२४७२-२२७३०१
Email Id-rdc1osmanabad@gmail.com

पुण्यश्लोक ३००

जा.क्र २०२५/उपचिटणीस/एमएजी-५/कावि-७८९/ सिआर-४६ दिनांक :- २८-१०-२०२५

## जाहिर प्रगटन
## ( विस्फोटक नियम २००८ चे नियम १०७)

सर्व नागरिक मौजे वाशी ता.वाशी जि. धाराशिव यांना या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, मौजे, वाशी ता. वाशी जि. धाराशिव येथील जमीन गट नंबर १३७१ मध्ये **श्री. गणेश शिवाजी कवडे** रा. तेरखेडा ता. वाशी यांनी शोभेची दारू तयार (फटाका निर्मिती) करणेची अनुज्ञाप्ती फॉर्म नंबर २० विस्फोटक नियम २००८ अन्वये अनुज्ञाप्ती एल ई-१ मिळणेसाठी अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे. प्रस्तावित जागेची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

**१. पूर्व बाजू - महावीर मोहन कागदे**
**२. पश्चिम बाजू - सोजर शिवाजी कवडे**
**३. दक्षिण बाजू - सोजर शिवाजी कवडे**
**४. उत्तर बाजू - शिव रस्ता**

सदर परवानगीबाबत स्थानिक चौकशी, मा.पोलीस अधीक्षक, धाराशिव/कार्यकारी अभियंता म.रा.वि.वितरण कंपनी, धाराशिव/कार्यकारी दंडाधिकारी, वाशी/कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जि.प.धाराशिव, महाराष्ट्र पोलुशन कंट्रोल बोर्ड,छत्रपती संभाजीनगर, सह संचालक औदयोगिक सुरक्षा व आरोग्य नांदेड यांचेमार्फत झालेली आहे.

तरी, **श्री. गणेश शिवाजी कवडे रा. वाशी. ता. वाशी** यांना मौजे. वाशी ता. वाशी येथील जमीन गट नंबर ६०२/ब मध्ये शोभेची दारू तयार करणेची अनुज्ञाप्ती फॉर्म नंबर २० विस्फोटक नियम २००८ अन्वये अनुज्ञाप्ती एल ई-१ ची परवानगी देणेबाबत कोणास कांही आक्षेप असल्यास, सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाले पासून (०८) दिवसाचे आत समक्ष हजर राहून या कार्यालयास लेखी सादर करावेत. विहित मुदतीत आक्षेप प्राप्त न झालेस पुढील नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
**(शोभा जाधव)**
**अपर जिल्हादंडाधिकारी, धाराशिव.**

**जिमाका/एके/जाहि/९१/२०२५**


## हिंद की चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समारंभानिमित्त जनजागृती कार्यशाळा

धाराशिव (जिमाका)- हिंद-की-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समारंभानिमित्त जनजागृतीसाठी तुळजापूर येथे ३१ ऑक्टोबर रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. नांदेड,नागपूर आणि नवी मुंबई येथेही या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. राज्यस्तरीय समन्वय समितीच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येणार असून कार्यशाळेसाठी मुख्यमंत्री सहायता निधीचे कक्ष प्रमुख व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष मंत्रालय मुंबई व राज्यस्तरीय समन्वय समितीचे सदस्य श्री रामेश्वर नाईक हे तुळजापूर येथे उपस्थित राहणार आहेत.

## जुगार विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान धाराशिव शहर पोलीसांनी दि.२७.१०.२०२५ रोजी धाराशिव शहर पो ठाणे हद्दीत सांजा वेस गल्लीतील लातुर टिन मेकर येथील पत्र्याचे बाजूस धाराशिव येथे छापा टाकला. यावेळी शकील वय ५७ वर्षे, रा. सांजा वेस गल्ली ता.जि. धाराशिव, सोहेल वय २५ वर्षे, रा. पाथरुड ता. माजलगाव जि. बिड ह.मु. गालीब नगर धाराशिव ता. जि.धाराशिव हे १३.४० वा. सु. सांजा वेस गल्लीतील लातुर टिन मेकर येथील पत्र्याचे बाजूस धाराशिव येथे कल्याण मटका जुगाराचे साहित्या एकुण १,८४० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले धाराशिव शहर पो. ठाणेच्या पथकास आढळले.तर बाळासाहेब वय ४३ वर्षे, रा.नारी ता. बार्शी जि. सोलापूर हे १५.३० वा. सु. धाराशिव ते सांजा जाणारे रोड लगत इंदीरानगर येथे कल्याण मटका जुगाराचे साहित्या एकुण १४,९०० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले धाराशिव शहर पो. ठाणेच्या पथकास आढळले. तर उत्तम रा.इंदीरानगर धाराशिव ता. जि. धाराशिव हे धाराशिव ते सांजा जाणारे रोडलगत जेके पान स्टॉलचे बाजूस कल्याण मटका जुगाराचे साहित्या मोबाईल एकुण २,७०० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले धाराशिव शहर पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द धाराशिव शहर पो ठाणे येथे स्वतंत्र ३ गुन्हे नोंदवले आहेत.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२
Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649